मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १०७ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०१६

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा सस्नेह नमस्कार.***

वरूण राजाची कृपादृष्टी झाल्यामुळे सर्वत्र चांगला पाऊस पडला आहे. पवित्र श्रावणमास सरून आता भादवा येईल. घरोघरी गणरायाच्या आगमनाची तयारी मोठ्या उत्साहात सुरू असेल. गणरायाचे स्वागताला आपले सर्व कुलबांधव सिद्ध झाले असतील. विघ्नहर्त्या, सुखकर्ता श्रीगणेशाला वंदन करूया.

मंडळी जून (हितगुज) २०१६च्या अंकात पृ. ३ वर 'आमची पंचाहत्तरी' सदरांत आपले लेखन लिहून पाठवावे अशी विनंती केली होती. काही कुलबांधवांनी त्याला अनुसरून लेख पाठविले आहेत. या अंकात त्यांना प्रसिद्धी दिली आहे. अजून ज्यांना लिहावयाचे आहे त्यांनी लिहून पाठवावे.

'आमची पंचाहत्तरी' कार्यक्रम साजरा करण्यासाठी आपण हॉल बुक केला आहे दि. ११ डिसेंबरला सकाळी १० ते २ या वेळात शिवाजी पार्क, दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मादाम कामा सभागृह, तळ मजला या ठिकाणी कार्यक्रम होणार आहे. तरी सर्वांनी आवर्जून उपस्थित राहा, कार्यक्रमात सहभागी व्हा आणि आनंद घ्या. वडिलधाऱ्या ज्येष्ठ कुलबांधव-कुलभगिनींचे शुभाशिर्वाद घ्यायला सुद्धा भाग्य लागते. आपल्या नशिबात ते आहे म्हणून आपण भाग्यवान!..... असो!

या अंकात, पंचाहत्तरीतील मान्यवरांचे लेख आहेत. त्यात श्रीमती निर्मला जनार्दन मराठे, पुणे, सौ. विजया का. मराठे, गोवा, निवृत्त न्यायाधीश श्री. अरुण भिकाजी मराठे, तळेगाव, श्री. वा. ग. मराठे, पुणे, या सर्वांचे उदबोधक, आठवणी वजा लेख वाचनीय व चिंतनीय आहेत.

## हार्दिक निमंत्रण

'आमची पंचाहत्तरी' निमित्त रविवार दि. ११ डिसेंबर २०१६ला स्वातंत्र्यवीर राष्ट्रीय स्मारक सभागृह, २५२, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, शिवाजी उद्यान, दादर (प.) मुंबई ४०० ०२८ (दूरध्वनी क्र. २४४६५८७७) या ठिकाणी सकाळी १० ते २ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. चहा भोजनाची व्यवस्था आहे. (देणगी-ऐच्छिक) तरी मोठ्या संख्येने आपण उपस्थित राहावे ही विनंती.

श्री. रविंद्र प्रभाकर मराठे हे बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (एमडी आणि सीईओ) म्हणून निवडले गेले. आपल्या मराठे प्रतिष्ठानची मान त्यामुळे उंचावली गेली आहे. श्री. रविंद्र प्रभाकर मराठे यांचा आम्हा कुलबांधवांना अभिमान आहे. 'प्रकाश झोत' मध्ये त्यांच्याविषयी लिहिले आहे.

मंडळी आपण सर्वजण ही सर्व पंचाहत्तरी साजरी करीत असताना आपले विद्वान कुलबांधव श्री. जनार्दन गोविंद मराठे हे आपल्याला सोडून गेले आहेत ते या कार्यक्रमासाठी नसणार याचे वाईट वाटते. दि. १० जुलै २०१६ ला त्यांच्या राहात्या घरी वार्धक्याने अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले.

मराठे प्रतिष्ठानचा आणि ज.गोंचा ऋणानुबंध फार पूर्वीपासूनचा जुना आहे. पुणे येथील मराठे प्रतिष्ठानच्या अधिवेशनाला त्यांची आणि बालकीर्तनकाराची चांगली जुगलबंदी झाली होती. कार्यवाह हेमंत मराठे यांनी

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

कुलबांधवांचा मेळावा भरवला होता. तेव्हा ज.गो.च्या घरी मिटींग ठेवली होती. त्या सभेला ज.गो. नी मार्गदर्शन केले होते. पुरळ येथे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात ज.गो.नी कीर्तन केले होते. त्यांना समाजकार्याची आवड होती. 'झाडे जगवा, झाडे वाचवा' हा उपक्रम त्यांनी राबविला. आगाशी, विरार येथे 'सुगीता मंडळ' स्थापन केले होते.

हितगुजच्या सप्टेंबर २००८च्या ७५व्या अमृत महोत्सवी अंकाचे प्रकाशन ठाण्याच्या लक्ष्मी केशव हॉलमध्ये झाले त्या समारंभाला ज.गो. आले होते. तेव्हा, ''हितगुजच्या संपादनाचे कार्य वाटते तेवढे सोपे नाही, अत्यंत जबाबदारीचे आहे. सौभाग्यवतीच्या कुंकूवासारखे त्याचे पावित्र्य आहे ते तुम्ही राखले पाहिजे, जपले पाहिजे,'' असा मोलाचा उपदेश मला केला. मी तो गंभीरपणे शीरोधार्य मानून त्याप्रमाणे काम करण्याचा प्रयत्न करते आहे. तीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे. त्यानंतर 'हितगुज'चे अंक नियमित ते वाचीत वाचून ते समाधानी, प्रसन्न होत, अंक चांगला निघतो आहे असे ते पत्र पाठवून आवर्जून कळवीत. ज.गो.सारखे असे अनेक रथी-महारथी आपल्या मराठे परिवारातील आहेत.

मंडळी या वर्षीही घरगुती गणेश स्पर्धा प्रतिष्ठानने आयोजित केली आहे व त्यासाठी भरघोस बक्षिसे ठेवली आहेत. दि. १८ सप्टेंबरपर्यंत आपल्या घरगुती गणपतींच्या सजावटीचे फोटो ईमेल ने पाठवून मराठे कुलोत्पन्न कोणीही व्यक्ती या स्पर्धेत भाग घेऊ शकेल. अधिक माहितीसाठी marathepratishthan.org या आपल्या संकेतस्थळाला भेट द्यावी. तरी मोठ्या संख्येने आपण यात सहभागी व्हावे.

'गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया'

असो.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २५ ऑगस्ट २०१६, गोकुळाष्टमी)



## नांदा सौख्य भरे

मराठे प्रतिष्ठानचे युवा प्रतिनिधी श्रीपाद (मकरंद) मेघ:शाम मराठे रा. कल्याण याचा शुभविवाह चि. सौ. का. अक्षया (श्रीमती अनुश्री व कै. अविनाश भिकाजी मुळ्ये, रा. अंधेरी), मुंबई हिचेशी शनिवार दिनांक २ जुलै २०१६ रोजी सांगली येथील खरे मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. नवपरिणितास शुभाशीर्वाद देण्यासाठी नातेवाईकांसह सामाजिक, शैक्षणिक, सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मराठे प्रतिष्ठानतर्फे चि. श्रीपाद व चि.सौ. अक्षया यांचे हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!**

## मानसन्मान

श्री. मिलिंद मराठे, ठाणे यांचे चिरंजीव कु. अनुव्रत (पृ. १२९) याने १० वीच्या परीक्षेत ९२.४०% मार्क मिळवले. एवढे घवघवीत यश मिळाले म्हणून चि. अनुव्रतचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा. मराठे प्रतिष्ठानद्वारा त्याला गुणवत्ता पारितोषिक देण्यात येईल. (त्याचे आजोबा श्री गजानन मराठे, पुणे यांनी चि. अनुव्रतची मार्कलिस्ट पाठविली आहे.)



अभिनंदन!

## चि. वेद विष्णु मराठे

गोवा राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी यंदा घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परीक्षेत गृह निर्माण साखळी, हरवळे, वसंत नगर येथील सरकारी प्राथमिक शाळेचा विद्यार्थी कु. वेद विष्णू मराठे याने ९७% गुण मिळवून डिचोली तालुक्यात द्वितीय येण्याचा मान मिळवला. त्याला शाळेतील शिक्षिका, आई सौ. पूजा विष्णू मराठे व बहिण कु. पूर्वा विष्णू मराठे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. त्याच्या या यशाबद्दल वडील श्री. विष्णू वसंत मराठे यांनी शिक्षक व हितचिंतकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. मराठे प्रतिष्ठानच्या वतीने कु. यश याचे हार्दिक अभिनंदन. असेच भरघोस यश त्याला भविष्यातही लाभो ही त्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

# श्री संत तुकाराम महाराजांची दत्तभक्ती

• **डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृष्ठ १२०) दूरध्वनी - ०२२-२४१५ ०८८९

**श्री संत तुकाराम महाराज (शके १५२०/३० - १५७१/७३)**

ज्ञानदेवांनी रचिलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीवर कळस होण्याचे भाग्य तुकारामांना लाभले. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथांच्या वीणा त्यांनी खांद्यावर घेतल्या. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तुकारामांचे कार्य फार मोलाचे असले तरी ते स्वतः चैतन्य संप्रदायी होते. श्री. बालाजी चैतन्य या साधुपुरुषाने त्यांना गुरुपदेश दिला होता.

श्री. वा. सी. बेंद्रे यांच्या मताने तुकोबांना जो गुरुपदेश झाला तो ओतुरास असलेल्या 'गंगावाट' या नावाच्या स्थानावर हा उपदेश स्वप्नात झाला. राघव चैतन्य - केशव चैतन्य - बाबाजी चैतन्य ही तुकोबांची गुरूपरंपरा होय. राघव चैतन्य मूळचे गिरनारकडील होत. त्यांची उपासना श्रीदत्ताची होती. जुन्नरजवळील डोंगरात त्यांनी तपश्चर्या केली. यांचा शिष्य केशवभट राजर्षी होय. याच्या साह्याने राघव चैतन्यांचा संप्रदाय कल्याणी, गुलबर्गा, आनंद या भागांतही पसरला. केशवभट हेच दीक्षा ग्रहणानंतर केशव चैतन्य झाले. राघव चैतन्यांना इस्लामी परंपरेत हजरत लाडके मशायक असे म्हणत. केशव चैतन्येचा मठ ओतुरास गंगावाटेवर होता. यांचे शिष्य बाबाजी चैतन्य असून त्यांचा उपदेश तुकाराम महाराजांना ओतुरास गंगावाटेवर स्वप्नात झाला.



तुकाराम आणि त्यांची अभंगवाणी एकमेकांपासून वेगळी काढता येणार नाही. 'अधिकार तैसा उपदेश' करून बुडल्या जनांना सर्व - शुद्रांना भक्तिपंथाचा मार्ग तुकारामांनी दाखविला. तुकारामांच्या अभंगगाथेत दत्तात्रेयाविषयी भक्तिभाव व्यक्त करणारे दोन अभंग आहे.

*तीन शिरे सहा हात। तया माझा दंडवत।।१।।*
*काखे झोळी पुढे श्वान। नित्य जान्हवीचे स्नान।।२।।*
*माथां शोभे जटाभार। अंगी विभूति सुंदर।।३।।*
*शंख, चक्र, गदा हातीं। पायी खडावा गर्जती।।४।।*
*तुका म्हणे दिगंबर। तया माझा नमस्कार।।५।।*

अशा त्रिमूर्तीला नमस्कार करून तुकाराम महाराज श्रीदत्तात्रेयावरील भक्ती उत्कटपणे व्यक्त करतात ती अशी

*नमन माझे गुरुराया। महाराजा दत्तात्रेया।।१।।*
*तुझी अवधूत मूर्ती। माझ्या जीवाची विश्रांती।।२।।*
*जिवींचे सांकडे। कोण उगवील कोडें।।३।।*
*अनुसूयासुता। तुका म्हणे पाव आता।।४।।*

त्याचप्रमाणे तुकारामांनी श्रीदत्तात्रेयांवर रचिलेली आरती प्रसिद्ध आहे ती अशी -

पतिव्रता सती अनुसूया माता। भक्तिते पाहुनिया तारिसी अनंता।
अत्रिऋषीच्या तपा तुष्टासी भगवंता। इच्छित पुरवित धांवसि हे त्रिगुणातीता।
ब्रह्मस्फूर्ति मूर्ती निजभक्तताता। तुझिया प्रसादें कैवल्य हाता।।१।।
जयदेव जयदेव दत्तात्र्य सिद्धा। आरती ओवाळूं ओमकारा शुद्धा।।ध्रु।।
शंख चक्र गदा कटिसूत्र नागा। दंडकमंडलु डमरू स्वरूपि सदा जागा।
जटामुकुटकुंडले कर्णी शोभत आहे। षट्पाणी द्वयजंघा पदि जान्हवी वाहे।
गौरश्यामश्वेत त्रिशीर विलसत हे। वक्षःस्थल कटिप्रवेश अतिशोभित आहे।।२।।
धूर्मितलोचन भाळीं त्रिपुंड्र चमकतसे। भस्मोद्धूलन व्याघ्रनिन प्रावर्ण असे।
नित्य प्रयागीं स्नान करवीरी भिक्षा। श्वानासंगे चेष्टसि मातापुरि दीक्षा।
हिंडसि चेष्टसि भेटसि भक्ता प्रत्यक्षा। देहनिशमना अमना उन्मनिच्या साक्ष।।३।।
निखिलब्रह्म हे विरचित स्वानंदे। प्रवर्तवर्ती छंदे निजपरमानंदे।
स्थूलसूक्ष्मसाक्षी तो प्रकट हाची। सुमट झाला झल्ति ज्योती निजज्योती।
भक्तप्रेमा मोहासि करिसी साऊलीं। तुक्यासाठी धांवे वत्सा माऊली।।४।।

श्रीतुकारामांचा दत्तात्रेय तीन शिरे, सहा हातांचा आहे. या आरतीमध्ये तुकाराम महाराजांनी दत्तात्रेयाला 'सिद्धा', 'ओम्कारा शुद्धा' ही विशेषणे लावली असून त्याचे मूर्तिवर्णन केले आहे. शंख, चक्र, गदा, पद्म, त्रिशूल, कमंडलू ही नेहमीची आयुधे त्याच्या हातात आहेतच पण विशेष म्हणजे त्यांच्या दत्तांनी कानांत कुंडले घातली आहेत आणि मस्तकावर मुंकुट आहे, असा अलंकारयुक्त दत्तात्रेय तुकारामांनी सजविला आहे. श्रीदत्तात्रेयाच्या विहाराबद्दल आरतीमध्ये सांगितले आहे की श्रीदत्तात्रेय प्रयागतीर्थात स्नान करून करवीरात म्हणजे कोल्हापूरात भिक्षादान करतात व मातापूर येथे दीक्षा घेतात. तुकारामांनी या आरतीत कुत्र्यांचाही उल्लेख केलेला आढळतो.

तुकारामांच्या या आरतीत आनुषंगिक रितीने तत्त्वज्ञान आलेले दिसते. मूलतः एकटेच असणारे परंतु सकारण ज्याच्याकडून या विश्वाची व त्यातील नाम-रूप-भेदाने वेगळ्या दिसणाऱ्या अनेकविश्व वस्तूंची उत्पत्ति केली जाते त्या मूलतत्त्वाशी म्हणजे ॐकाराशी दत्तात्रेयाचे साम्य तुकाराम दाखवितात आणि म्हणून -

*'ब्रह्मस्फूर्ति मूर्ती निजभक्तताता। तुझिया प्रसादें कैवल्य हाता।।*
*जयदेव जयदेव दत्तात्रय सिद्धा। आरती ओवाळूं ओमकारा शुद्धा।।ध्रु।।*

असे म्हणून 'दत्त' या दैवताचे 'ब्रह्म', 'ॐकार' शब्दांनी वर्णन करतात.

दत्ताच्या कानांतील कुंडले, दत्तात्रेयाचे भस्मोद्धूलन, त्याचे व्याघ्राजिन परिधान करणे, भाळी असलेला त्रिपुण्ड्र आणि दत्तात्रेयाचे 'सिद्ध' हे विशेषण इ. उल्लेख तुकारामांचा दत्तात्रेय हा शिवस्वरूपाचा असल्याचे ध्वनित करतात. गिरनारच्या दत्तक्षेत्रावर शिवाचीच उपासना चालते हे या संदर्भात लक्षात घेतले म्हणजे हा तर्क अधिक बळकट होतो. तुकाराम महाराज दत्तात्रेयासंबंधात, 'अमना - उन्मनिच्या साक्षा' असा उल्लेख करतात. मन उन्मनाचा विचार गोरखबोधात होताना आढळतो.

तुकाराम महाराजांची ही दत्तभक्ती, चैतन्य संप्रदायाचा तात्त्विक उपदेश त्यांना मिळाल्यामुळे त्यांच्या अभंगामध्ये अवतरली असाविसे दिसते. तुकारामांच्या अभंगातील 'तीन शिरे सहा हात' इत्यादी दत्तात्रेयाचे ध्यान आज घरोघरी दत्तात्रेयाच्या तसबिरीमध्ये अमर झालेले आढळते.

गिरनारकडील चैतन्य संप्रदायाच्या गुरुपरंपरेतील बाबाजी चैतन्यांनी, तुकाराम महाराजांना गुरुपदेश देऊन त्यांचा अंगिकार केला असे तुकारामांनी स्वतःच म्हटले आहे याचा अर्थ तुकाराम मूलतः दत्तसंप्रदायीच ठरतात, परंतु वारकरी पंथातील त्यांच्या अलौकिक कार्यामुळे त्यांचे हे मूळ स्वरूप लोप पावलेले दिसून येते.

❖

# आजोबा

• **श्री. वा.ग. मराठे,** पुणे (पृष्ठ ५०३) भ्रमणध्वनी - ९३२४७८०३४५

आजोबा आजोबा काठी घ्या।।
नको रे बाबा काठी
माझी झाली साठी।।
घेईन तुला पाठीशी
मनी मावशी उपाशी।।
आजी नाही म्हणून
दूध आणू कुठून।।
दही दूध तूप
बैस कसा गुपचुप।।
पापड सांडगे आणि कुरड्या
खायला नाही दिल्या।।
आजी नाही म्हणून
हळुच फोटो येतो पाहून।।
शेंगदाणे होते भाजलेले
कुणी तरी लपवून ठेवलेले।।
डबा बंद झाला
पण वास मला आला।।
सगळे सांगतात
सगळे सांगतात कोलस्टेरॉल वाढला
चहाला साखर कमी घाला।।
रक्तदाब
हवेचा दाब
पाण्याचा दाब
भार नियमन
आणि आजोबांचे दहन
कोण करणार अंदाजपत्रकांचे वाचन



# कधीही न विसरणारी गोष्ट

• **सौ. विजया का. मराठे,** खोर्ली-म्हापसा गोवा (पृष्ठ ५३१) दूरध्वनी - ०८३२-२२५३०५१

मी राहाणारी गोव्याला. माझे माहेर सांगली.

दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. माझ्या भाच्याला नातू झाला. (भावाचा मुलगा) त्याचा फोन आला. आत्या तू पणजी झालीस. बारशाला ये. फुले उधळूया (सोन्याची)

आम्ही १२ भावंडांमध्ये फक्त तीनच बहिणी आहोत. म्हणून भाच्याचा परत परत फोन येऊ लागला. पावसाचे दिवस असल्याने मी जाण्यास नाराज होते. पण माझी मुले म्हणू लागली इतक्या आग्रहाने बोलवतो आहे तेव्हा चल. आणि सांगलीच्या मुलीने पण ये म्हणून फोन केला.

बारशाच्या आधी दोन दिवस माझ्या मुलाने मला पणजी ते तासगाव बसमध्ये बसवून दिले. बसमध्ये माझ्या शेजारी तासगावला जाणारे दोघे काका-काकू (नवरा-बायको) साधारण माझ्याच वयाचे होते. ८ ते ९ तासाचा प्रवास आणि पाऊस भरपूर त्यामुळे खाली उतरता येईना. पण काकू व मी कोल्हापूर स्टँडवर उतरलो. काका पण उतरले. त्यांनी उतरताना कंडक्टरला सांगितले होते. पण आम्ही ५ मि. येतो तो पर्यंत बस सुटली. पाहातो तो बसस्टँडच्या बाहेरसुद्धा पोहोचली. आम्हाला काय करावे ते कळेना. आम्ही डेपोत जाऊन सांगितले. पण ते ऐकण्यास तयार होईनात.

काकांच्या खिशात तिकीट होते. ते त्यांना दाखविले. त्यांनी सांगितले, 'सांगली डेपोला फोन करतो. तुम्ही दुसऱ्या बसने सांगलीला चला.' माझ्या जवळ काहीच नव्हते. पण काकांनीच माझे तिकीट काढले. आम्ही सांगलीला जाणाऱ्या बसमध्ये चढलो. काकासुद्धा मला देवासारखे भेटले.

माझ्या शेजारी बसलेल्या बाईनी काय झाले म्हणून विचारले मी त्यांना सर्व हकीगत सांगितली. त्या म्हणाल्या उतरवून घेणाऱ्यांना फोन करा. माझी मुलगीच येणार आहे. पण माझ्या जवळ मोबाइल नाही. सर्व बसमध्ये आहे. मी मुलीचा नंबर सांगितला त्यानी मोबाइल लावून माझ्याकडे दिला. रिंग होताच मी मुलीचे नाव (वंदना) घेऊन मी तुझी आई बोलते असे सांगितले. त्यामुळे तिने फोन घेतला.

मी माझी झालेली सर्व हकीगत सांगितली. पणजी ते तासगाव ही बस आहे. ती ५ वा. सांगलीला पोहोचेल. माझ्या बरोबर तासगावला जाणारे काका काकू आहेत.

मी माझे सामान बसमध्ये कुठे आहे? ते सांगितले व त्यानी पण आपले सामान सांगितले विशेष सांगायचे म्हणजे मी अंगावरील दागिने केव्हा काढत नाही. मुंबईला गेले तरीसुद्धा. मुले म्हणून लागली दागिने काढून ठेव म्हणून मी ते सुटकेसमध्ये ठेवले. पण काकूचे सांगितले तर 'आश्चर्य वाटेल' त्यांनी आपले सर्व दागिने साध्या कापड पिशवीमध्ये दोन तीन साड्यांच्या घडीत ठेवून ती पिशवी अशी वर ठेवली होती (४ बिलवर, पाटली, तोडे, नेकलेस हार इ.)

आमच्या शेजारी बसलेले २-३ पुरुष व एक बाई यांना आम्ही सांगली व तासगावला उतरणार आहे. आणि सामान माहित होते. ते सर्व जयसिंगपुरला उतरणार होते. 'त्यांनी असा आमच्या मनात विचार आला.

पणजी ते तासगाव गाडी सांगलीला पोहोचली. तोपर्यंत माझे जावई पण स्टँडवर आले. कंडक्टर, ड्रायव्हर डेपोत सही करून आले. त्यांनी सांगितले गाडी इतक्या वेळ उभी करू शकत नाही. तुमचे सामान पाहून घ्या. सीट खाली एक सुटकेस होती. ती कंडक्टरच्या समोर उघडून पाहिली. सुटकेसमध्ये वरच एक साडी व बाजूस पंचा यावरून ओळखली. नंतर तिने फोन केला तो सीट खाली असलेल्या बटव्यात वाजला. ती माझी बॅग हे कळले. सामान उतरवून घेतले. व काका काकूचे तासगाव डेपोला उतरवितो म्हणून सांगितले. इतक्यात आम्ही आलो.

मुलीने त्यांना सांगितले. तुमचे सामान तासगाव डेपोवर ठेवतो त्यांनी मुलीचे आभार मानले. व देव कसे भेटलात. ते त्याच गाडीने तासगावी गेले. आपले सामान पाहून खूप बरे वाटले. व लगेच मुलीला खूप खूप आभारी, देवासारखे भेटलात. असा फोन केला. म्हणतात ना 'देव तारी त्याला कोण मारी' त्याप्रमाणे 'देवतारी त्याला कोण चोरी'

ही गोष्ट माझ्या डोक्यातून २ दिवस जाईना.

सर्वांनी माझे कौतुक केले, की मुलीचा नंबर पाठ होता. मोबाइलमुळे नंबर पाठ नसतात. ही गोष्ट मी कधीच विसरू शकत नाही. बसने जाताना आठवण येते.

❖

सुविचार

पंढरीची वारी जयाचिये कुळी
त्याची पायधुळी लागो मज

येतसे ते सहजा।
जातसे ते मुक्ती।।

# ।। तस्मै श्री गुरवे नमः ।।

• **श्री. प्रशांत चंद्रकांत मराठे** (पृ. ११७), खुडीपाट भ्रमणध्वनी – ७७७४८१५२९५

'मराठे प्रतिष्ठान'च्या सर्व कुलबांधवांना आणि भगिनींना माझा आदरपूर्वक नमस्कार. 'हितगुज'सारख्या प्रभावी माध्यमातून आपला अनेक मित्रमैत्रिणींशी आणि परिवारातील ज्येष्ठ व्यक्तींशी परिचय होत असतो. त्यामुळे आपली एकमेकांशी ओळख वाढत जाते आणि परिवारामध्ये एक घट्ट निर्मळ नाते तयार होते, संवाद वाढतो. आजपर्यंत आपण आपल्या परिवारातील अनेक लोकांबद्दल आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल वाचलेले आहे, ऐकलेलेसुद्धा आहे. आणि 'हितगुज' अशा व्यक्तींचा नेहमीच आदर करते याचा खूप आनंद आहे.

आजही आपण आपल्या परिवारातील अशाच एका ज्येष्ठ व्यक्तीचा; परिचय करून घेणार आहोत. आपल्यापैकी अनेकांना कदाचित त्यांच्याविषयी माहिती असेल परंतु त्यांच्या कार्याची माहिती जास्तीत जास्त सदस्यांपर्यंत पोहोचावी यासाठी हा खटाटोप.

आज आपण ओळख करून घेणार आहोत एका अशा व्यक्तीची ज्यांनी एका छोट्याशा खेडेगावात गेली २० वर्षे ज्ञानाची ज्योत अखंड तेवत ठेवली ते म्हणजे आम्हा सर्व विद्यार्थ्यांचे लाडके वसंतकाका अर्थात श्री. वसंत रावजी मराठे. खरंतर तसे ते आमचे 'आजोबा' पण आम्ही सर्वजण अगदी लहानपणापासून त्यांना 'वसंतकाका'च म्हणायचो. आपण थोडंसं जाणून घेऊया त्यांच्या आजपर्यंतच्या प्रवासाबद्दल.

**जन्म आणि शिक्षण :**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यामधील खुडी गावच्या खुडीपाट वाडीतला त्यांचा जन्म (१५ जून १९४१). घरची परिस्थिती तशी बेताचीच. त्यामुळे त्यांचं शिक्षणही तसं खडतर परिस्थितीत झालं. जे वय खेळण्या बागडण्याचं, त्या वयात त्यांना तीन चार किलोमीटरचा रोज पायी प्रवास करून शाळेत जायला लागायचं. परंतु लहानपणापासूनच अभ्यासाची आवड असल्यामुळे त्यांनी त्याही परिस्थितीत काही वर्ष खुडीपाट आणि आचरा अशा दोन वेगवेगळ्या गावांमधून आपलं शालेय शिक्षण पूर्ण केलं. पण नुसतं तेवढयावरच भागणारं नव्हतं त्यामुळे त्यांनी माध्यमिक शिक्षण घ्यायचं ठरवलं. पुन्हा प्रश्न होताच कि हे करायचं कसं? पण दैवयोगाने त्यांना मुंबईला जाण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या आयुष्याला एक नवी दिशा मिळाली. मुंबई...अनेकांच्या स्वप्नातील नगरी.. मुंबईत दादरमधील छबिलदास हायस्कूलमध्ये त्यांना प्रवेश मिळाला. पुढे १९५९ साली तत्कालीन SSC म्हणजे सध्याच्या SSC पुढे एक वर्ष अशी मॅट्रिकची परीक्षा ते उत्तीर्ण झाले. आता त्या काळी मॅट्रिक म्हणजे बरंच शिक्षण. तेव्हा मॅट्रिक पास झालं कि सहज नोकरी लागायची. पण तरीही त्यांनी काहीतरी व्यावसायिक शिक्षण घ्यायचं ठरवलं. पुढे काही कारणामुळे त्यांना पुन्हा कोकणात यावं लागलं. त्या काळी कोकणात औद्योगिक शिक्षण देणारी एकच संस्था नुकतीच रत्नागिरी येथे सुरू झाली होती म्हणून काकांनी तिथे प्रवेश घेतला. तेव्हा ITI Mechanical क्षेत्रातील त्यांनी शिक्षण घेतले. त्यातल्या Drawing मध्ये त्यांना विशेष आवड होती. त्यात ते इतके पारंगत होते कि १९६२ साली भांगर इंडस्ट्रीजमध्ये त्यांची Campus Interview मधून निवड झाली.

**नोकरी आणि व्यवसाय :**

भांगर इंडस्ट्रीजमध्ये निवड झाल्यावर त्यांना पुन्हा मुंबईमध्ये यावं लागलं. तिथे काही वर्ष 'Docsman' म्हणून काम केले. सुरुवातीला Mechanical क्षेत्रात काम करत असता पुढे हळूहळू त्यांचा Electronics क्षेत्राशी संबंध आला. त्यानंतर त्यांनी अनेक वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम केले. २२ वर्ष त्यांनी नोकरी केली आणि पुढे या २२ वर्षांच्या अनुभवाच्या जोरावर स्वतःचा व्यवसाय सुरू केला. ते स्वतः एकटेच Projects करू लागले. २२ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि ओळखीचा त्यांना फायदाही झाला. मला सांगायला अतिशय आनंद वाटतो कि त्या काळी त्यांनी L & T सोबत काम केले आहे. व्यवसाय करताना त्यांना अनेक चढउतारांचा सामनासुद्धा करावा लागला पण त्यातूनही मार्ग काढत त्यांचा प्रवास सुरू होता.

या दरम्यान त्यांचे गावी येणे जाणे व्हायचे. गावातील एकंदरीत परिस्थिती बिकट असली तरी गावच्या मातीची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणून जवळपास १० वर्षांपासून करत असलेला व्यवसाय थांबवण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला.

**स्वगृही परत आणि शैक्षणिक कार्य:**

१९९४ साली ते खुडीपाटला परत आले तेव्हा मी होतो जेमतेम ४ वर्षांचा. ते परत आले तेव्हा तशी इथली परिस्थिती फार बदलली नव्हती. अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडून देत

होती. अभ्यासात कोणाला रसच नव्हता आणि हे सर्व पाहून त्यांचं मन विचलित होऊ लागलं. तेव्हा त्या मानाने आम्ही खूपच लहान होतो. मी आणि माझ्यासारख्या अनेक मुलांकडे पाहून काकांना नेहमी वाटायचं कि हि पिढी तरी चांगली शिकली पाहिजे. दुर्दैवाने १९९७ साली आमच्या गावात पूर आला आणि सर्वांचे संसार उद्ध्वस्त झाले. अशा परिस्थितीत काकांनी आपली क्लासची पहिली बॅच सुरू केली. आणि मला सांगायला अतिशय अभिमान वाटतो कि मी त्यांच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी आहे. आताच्या Junior KG आणि Senior KG, English Mediumच्या Fees ऐकून सामान्य माणसाला घाम फुटतो. काका तर १९९७ पासून आतापर्यंतच्या म्हणजेच २०१६ पर्यंतच्या पहिली ते सातवी पर्यंतच्या सर्व मुलांसाठी विनामोबदला ज्ञानदानाचे पुण्यकर्म करत आहेत.

ज्ञानदानासोबतच गावातील ST वाहतुकीचे काही प्रश्न असतील तर ते सोडवणे, त्यासाठी स्वतः अर्ज लिहून पाठवणे, वेळ पडल्यास स्वखर्चाने सरकारी कचेरीत जाणे, गरीब गरजू लोकांना त्यांच्या कामामध्ये काही समस्या असल्यास त्या सोडवणे अशा अनेक कामांमध्ये ते आवर्जून पुढाकार घेत असत आणि अजूनही घेतात.

आज वयाच्या ७६ व्या वर्षीही काका ज्ञानदानाचे काम न थांबता, न थकता करत आहेत. आजही त्यांचा Fitness तरुण पिढीला लाजवेल असाच आहे. घरी एकटे असतात आणि सर्व स्वतःची कामे स्वतः करतात. कुठल्याही कामासाठी त्यांच्याकडे नोकर नाही. वेळ पडल्यास आजही ४ ते ५ कि.मी अंतर पायी जाण्याची त्यांची तयारी आहे.

**मला त्यांची काही कामे आवर्जून मांडाविशी वाटतात.**

१. पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास घेणे (२० वर्षे विनामोबदला हे चालू आहे) त्यांनी जवळपास ७० ते ८० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मोफत शिकविले आहे.

२. गरीब विद्यार्थ्यांना स्वखर्चाने मदत करतात. या कामासाठी आत्तापर्यंत २ लाख रुपये त्यांनी स्वतःचे खर्च केलेले आहेत.

३. सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत गरीब आणि होतकरू मुलींच्या शिक्षणासाठी स्वतः खर्च करतात. काकांच्या कुटुंबातील अनेक सदस्य आवर्जून ह्या कार्यात सहभागी आहेत. काका स्वतः शक्य तेवढया लोकांशी संपर्क साधून मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगतात. (अजूनही खेडेगावात मुलींचे शिक्षण ह्या विषयाला दुय्यम स्थान दिले जाते ही वस्तुस्थिती आहे)

– (ह्या योजनेअंतर्गत त्यांना अनेक दानशूर व्यक्तींचे सहकार्यही लाभले आहे)

४. गावच्या शाळेमध्ये एक मोठे वाचनालय व्हावे अशी त्यांची इच्छा आहे त्यासाठी ते प्रयत्न करत आहेत आणि त्यांच्या ह्या प्रयत्नांना हळूहळू यशही येत आहे. (मी आणि माझ्यासारखे काही विद्यार्थी त्यांच्या ह्या कार्यात एक खारीचा वाटा म्हणून शक्य तेवढी मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत किमान तसा संकल्प तरी केला आहे)

आपल्यापैकी कोणाला जर त्यांच्या ह्या कार्यात पुस्तकरूपी मदत करावयाची असल्यास खालील पत्यावर पुस्तके पोस्टाने पाठवू शकता. किंवा खालील दूरध्वनीवर संपर्क करू शकता.

५. गावामध्ये 3G Internetची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे Youtube किंवा Googleचा फायदा मुलांच्या शिक्षणासाठी करून घेता येत नाही. पण शाळेमध्ये Projector उपलब्ध आहे म्हणून पर्यायी व्यवस्था म्हणून दुसऱ्या ठिकाणाहून Video डाउनलोड करून मुलांना मार्गदर्शनपर Video दाखविण्याचा मानस आहे. ह्यामध्ये प्रामुख्याने UPSC, MPSC सारख्या स्पर्धा परीक्षा किमान कशा असतात ह्याचे मार्गदर्शन व्हावे तसेच अनेक दिग्गज लोकांचे अनुभव मुलांना कळावेत एवढाच हेतू आहे. हा उपक्रम लवकरात लवकर सुरू करत आहोत.

ही आणि यासारखी बरीच कामे वसंतकाका करत आहेत आणि अजून करावयाची आहेत.

एवढी वर्षे काम करूनही एखादी व्यक्ती प्रसिद्धीपासून दूर राहाते हा त्यांचा स्वतःचा मोठेपणा झाला पण त्यांचा विद्यार्थी म्हणून मला त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकावासा वाटला. आज त्यांचे अनेक विद्यार्थी चांगल्या कंपनीमध्ये मोठमोठ्या हुद्यावर काम करत आहेत. काही जणांचा स्वतःचा व्यवसायसुद्धा आहे.

१० वर्षे यशस्वीपणे चालू असलेला व्यवसाय तसाच चालू ठेवला असता तर आज त्या छोट्या व्यवसायाचं रूपांतर कदाचित मोठ्या कंपनीत होऊ शकलं असतं पण काही व्यक्ती अशाही असतात ज्यांच्यासाठी पैसा हेच सर्वस्व नसतं. कदाचित त्यांच्या या कार्यामुळेच आजही काकांना गावातली एक सन्माननीय व्यक्ती म्हणून गेली अनेक वर्षे लोक ओळखतात. त्यांच्या शिकवणीचे महत्व बाकी कोणी नाही पण खुडीपाट मधला प्रत्येक विद्यार्थी निश्चितपणे जाणतो. शेवटी गुरू हे गुरुच असतात. म्हणूनच जाता जाता श्लोकातील ओळी आठवतात...

***गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर:।***
***गुरु:साक्षात्परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नम:... !!!***

वसंतकाकांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. आई जगदंबा त्यांना दीर्घायुष्य देवो हीच तिच्या चरणी प्रार्थना... !!!

(आपल्यापैकी जर कुणाला दत्तक पालक योजना अथवा वाचनालय ह्यापैकी कोणत्याही उपक्रमासाठी हातभार लावायचा असल्यास तसेच संबंधित विषयांविषयी अधिक माहिती जाणून घ्यावयाची असल्यास आपण श्री. वसंत मराठे यांच्याशी खालील दूरध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधू शकता )

श्री वसंत रावजी मराठे, मु.खुडीपाट पो.खुडी, ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग, पिन ४१६६११, दूरध्वनी: ०२३६४ २१५१५७/ ०२३६४ २१६६२८ (पर्यायी)

Email Us At : prashantmarathe5@gmail.com

❖

# कोकणस्थ

• **श्री. ताम्हनकर**

मी आहे ब्राह्मण कोकणस्थ
आम्ही कधीच बसत नाही स्वस्थ
रितीरिवाजांमध्ये आमचा नंबर आहे
आमचीच पालखी प्रत्येकजण वाहे
बचतीचा मार्गच आम्हा डोहे
आम्ही कधीच नसतो अस्ताव्यस्त
मी आहे कोकणस्थ।।१।।

वंश परंपरा आम्ही दांडीवर कपडे टाकतो
पण त्याचा क्रम कधीच बदलत नसतो
बदलला तर आम्ही लगेच पिसाळतो
दुसऱ्या जातीची सून आली तर होतो त्रस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।२।।

एका काडीनेच गॅस पेटवितो
लगेच दुसऱ्या गॅससाठी विझवून ठेवतो
वरणभाताशिवाय आम्ही जेवत नसतो
त्यानेच जेवण होते मस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।३।।

लोकमान्य आमच्यातच जन्माला आले
सर्व क्रांतिकारक आमचेच झाले
स्त्रियांना आण्णासाहेबांनीच उद्धरले
साधू न होता राहावे नेहमी व्यस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।४।।

भांडणात आम्ही कमी नाही
तत्त्वांसाठी आमचे आयुष्य जाई
वाट्यामध्ये झाडूची सुद्धा विभागणी होई
त्यासाठी आम्ही होत नाही त्रस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।५।।

लाचारी करून होत नाही दीन
व्यवहार करताना नडतो अभिमान
नेहमी असते आमची ताठ मान
खर्चावर असते आमची गस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।६।।

गॅस सिलेंडरवर तारीख लिहितो
आधी संपला तर उपवास घडतो
उपवासाचे कधीच खात नाही जास्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।७।।

दादासाहेब फाळकेंनी सिनेमा सृष्टीचा पाया घातला
राजा परांजपे यांनी देशभर पसरविला
माधुरीने त्यावर कळस चढविला
असे क्षेत्र नाही जेथे पोहोचत नाही आमुचा हस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।८।।

महिन्याचा पेपर रद्दी लावलेली असते
वाण्याला तागडीची गरजच नसते
त्याच पैशातून भिशी चालत असते
पै-पैसा करून आम्ही घेतो खस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।९।।

चोवीस कॅरेट शिवाय सोने नाही घेत
पेठे गाडगीळांशिवाय दुसरे दुकान नाही पाहात
दागिन्यांत आमची असते सर्वांवर मात
आता नाही वापरत तांबा पितळ जस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।१०।।

दोन-चार दुकाने पालथी घातल्याशिवाय साडी नाही घेत
किंमतीत घासाघीस केल्याशिवाय नाही राहात
मॅचिंग ब्लाऊजशिवाय साडी नाही नेसत
खरेदीनंतर पाणीपुरी करतो फस्त
मी आहे ब्राह्मण कोकणस्थ।।११।।

***(साभार साप्ताहिक 'प्राजक्त' - कोल्हापूर)***

❖

# आमची पंचाहत्तरी

• **श्री. अरुण भिकाजी मराठे,** तळेगाव (पृष्ठ ५०९) भ्रमणध्वनी – ९२७२२२२३५०

'हितगुज'च्या जून २०१६ च्या अंकामध्ये 'आमची पंचाहत्तरी' या शीर्षकाने ज्या मराठे कुलबांधवांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली आहे त्यांना स्वतःच्या जीवनातील अनुभव लिहून पाठविण्यास आवाहन केले आहे. त्याच अंकामध्ये 'चतुर बिरबलाच्या बालकथा – बालोद्यान' या सदरामध्ये अकबर बिरबलाची एक छोटीशी बोधकथा छापलेली आहे. या दोन गोष्टी वाचून प्रेरणा मिळाल्यामुळे मी हा लेख लिहीत आहे.

लहानपणी माझी महत्त्वाकांक्षा लेखक होण्याची होती. ती पार पडू शकली नाही. प्रत्यक्षात मी इंग्रजी लघुलेखक झालो व लघुलेखक म्हणून एका प्रसिद्ध वकील साहेबांकडे नोकरी केली. नोकरी करतांना एलएलबी व एलएलएम ह्या पदव्या प्राप्त केल्या. थोडी वकीली केली व न्यायखात्यात न्यायाधीश म्हणून प्रवेश केला. न्यायाधीश म्हणून सत्तावीस वर्षे नोकरी केली व अठरा वर्षांपूर्वी निवृत्त झालो. आता लवकरच माझी सत्याहत्तरी पूर्ण होईल. ही या लेखामागची पार्श्वभूमी.

न्यायाधीश म्हणून मी फौजदारी (Criminal), दिवाणी (Civil) व मजुरांचा कायदा (Labour Law) या तिन्हीं क्षेत्रांमध्ये काम केले. तिन्हीं क्षेत्रांमध्ये 'दरमहा जितके काम व्हावयास पाहिजे तितके तुमचे काम नाही. जास्त काम करा' अशा टपल्या वरिष्ठांकडून खात खात नोकरी पूर्ण झाली.

सुरुवातीस न्यायदंडाधिकारी म्हणून काम करतांना आरोपींना भारी शिक्षा केली तर जग सुधारेल अशी गोड गैरसमजूत मी करून घेतली होती. म्हणून मोठी शिक्षा फटकारित असे. नाराज पक्षकार अपील करून माझा न्याय निर्णय फिरवीत असे.

काही काळानंतर उच्च न्यायालयाने निम्न श्रेणीच्या न्यायाधिशांची लेखी व तोंडी परीक्षा पदोन्नतीसाठी घेण्याचे ठरविले. मी पाच वेळा या परीक्षा दिल्या. पदोन्नती मिळाली नाही. सहाव्या परीक्षेच्या वेळेस सुरुवातीच्या लेखी परीक्षेचा प्रश्न भारतीय घटनेच्या अनुच्छेद २१ वर निबंध लिहा असा होता. निबंधाला वीस गुण होते. म्हणजे साधारण चार फुलस्केप पाने एवढा निबंध अपेक्षित होता.

अनुच्छेद २१ चे मराठीत भाषांतर असे होऊ शकेल :–

'कोणत्याही व्यक्तीचे जीवित अथवा स्वातंत्र्य, कायद्याप्रमाणे स्थापित झालेली प्रक्रिया अनुसरल्याशिवाय हिरावून घेता येणार नाही.' कायद्याप्रमाणे स्थापित झालेली प्रक्रिया म्हणजे कोणती प्रक्रिया? ती प्रक्रिया जाणून घेण्यासाठी एव्हिडन्स ॲक्ट व क्रिमिनल प्रोसीजर कोड यामध्ये नमुद केलेल्या क्लिष्ट तरतुदी जाणून घेतल्या पाहिजेत. कायद्याप्रमाणे स्थापित झालेली प्रक्रिया ही न्यायी, व्याजवी व न्यायसंगत हवी असे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ठरविले आहे. या सर्वांचा विचार करून मी चार पानी निबंध लिहून काढला. त्यामुळे व मी केलेल्या कामगिरीमुळे मला पदोन्नती मिळाली.

या माझ्या अनुभवामुळे हितगुजच्या अंकात 'बालोद्यान' या सदराखाली 'फाशीची शिक्षा' नावाचा जो चुटका छापून आला आहे त्याची सार्थकता माझ्या लक्षात आली. अकबर बिरबलाची ती कथा अशी आहे की अकबर बादशहा रागाच्या भरात एकदम कोणालातरी फाशीची शिक्षा सुनावत असे. एकदा अशीच शिक्षा त्याने फरमावली व बिरबलाला सांगितले. 'बिरबल, तू आता या बाबतीत एक अक्षरही बोलू नकोस, जर बोललास तर तू जे बोलशील त्याच्या उलट मी करीन.' बिरबल चतुर होता, त्याने क्षणभर विचार केला व म्हटले, 'जहाँ पनाह, या माणसाला ताबडतोब फाशी द्या' बादशहाला स्वतःच्या शब्दाला जागावे लागले. कारण बिरबल जे म्हणेल त्याच्या उलट करीन असे त्याने म्हटले होते. म्हणून बिरबलशाने ज्याला फाशी सुनावली होती त्याला सोडून दिले.

आता या गोष्टीतला विनोदाचा भाग जरी सोडून दिला तरी एक स्पष्ट हकीकत समोर येते की अमुक एक मनुष्य गुन्हेगार आहे की नाही हे नक्की करणे वाटते तेवढे सोपे नाही. मनुष्याचे मन चंचल आहे. जिभेला हाड नसते असे म्हणतात. कोर्टात साक्ष देणाऱ्या बहुतेक साक्षिदारांच्या जिभांमध्ये हाड नसते. ते वाटेल ते बोलतात. असे बोलणाऱ्यांच्या जिभांना लगाम घालण्यासाठी एविडन्स ॲक्टची रचना अशी करण्यात आली आहे की आरोपीवर कमीत कमी अन्याय व्हावा. निदान कोणत्याही निरपराध माणसाला कधीही शिक्षा होऊ नये.

न्यायाधीश म्हणून पंधरा वर्षे नोकरी केल्यानंतर मला पदोन्नती मिळाली व सोळा वर्षे नोकरी झाल्यानंतर फाशीची शिक्षा ठोठावण्याची सत्ता मिळाली. ती सत्ता मिळाल्यानंतर मी मनाशी खूणगाठ बांधली की शक्यतो कोणाला शिक्षा करायचीच नाही व केलीच तर फाशीची शिक्षा कधीच करायची नाही, अगदी फाशीची शिक्षा केलीच पाहीजे असे वाटलेच तर आरोपीला निर्दोषच सोडून द्यावे. म्हणजे नाराज होऊन सरकार उच्च

न्यायालयात अपील करेल व अकबर बिरबलाच्या वर नमुद केलेल्या गोष्टीत सांगितल्याप्रमाणे निम्न श्रेणीच्या न्यायाधिशाने जे ठरविले आहे त्याच्या उलट उच्च न्यायालय करेल... व न्याय होईल?

भारतातील प्रचलित न्याय पद्धती म्हणजे एक प्रकारची लढाईच आहे. फक्त ही लढाई बंदुका, तोफा, बॉम्ब इत्यादी साधनांद्वारे लढावयाची नसून शब्दांच्या साहाय्याने लढावयाची आहे. म्हणून गुजराथीत म्हण आहे, 'बोलो तेना बोर वेचाय'. म्हणजे ज्या विक्रेत्याला गोड बोलता येते त्याचा माल विकला जातो. चांगल्या वकीलांना ही म्हण लागू पटते. गुजराथीत दुसरीही एक म्हण आहे. 'न बोलवामा नव गुण' म्हणजे फार न बोलण्यातच शहाणपण आहे. ही म्हण न्यायाधीशांना लागू पडते. न्यायाधीशांनी फार बोलू नये. दोन्हीं पक्षांचे बोलणे शांतपणे ऐकून न्यायोचित न्यायनिर्णय लिखित रूपाने द्यावा.

मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना झाल्यानंतर पाहीले सरन्यायाधीश जस्टीस सॉसी होते. ते फारसे बोलत नसत. वर्तमानपत्रे वाचून आपले मन पूर्वग्रहदूषित होऊ नये म्हणून वर्तमानपत्रेसुद्धा वाचत नसत. म्हणून वकीलांनी त्यांना टोपणनाव दिले, 'सॉसी द सायलेंट'!

'हितगुज'च्या संपादकांना छापावेसे वाटतील असे माझे अनुभव संपले व शब्द मर्यादाही जवळ आली. म्हणून तुकारामांचा एक अभंग लिहून हे लेखन संपवतो :-

*'लहानपण देगा देवा, मुंगीसाखरेचा रवा।*
*ऐरावत रत्न थोर, तया अंकुशाचा मार।।*

तुका म्हणे ऐसे जाण, व्हावे लहानाहुनी लहान'

तुकारामांनी लहानाहून लहान होण्याचा ध्यास धरला. म्हणून ते आकाशाएवढे मोठे – महान झाले.

❖

---

प्रेषक

# आदर्श बोध

• **श्री. वा.ग. मराठे,** पुणे (पृष्ठ ५०३) भ्रमणध्वनी – ९३२४७८०३४५

सहसा वचन देऊं नका.
सत्य सदा बोलावें.
कोणास निंदूं नका.
संगत चांगल्याची धरा अगर मुळींच
धरुं नका.
दिलेला शब्द खरा करा.
केव्हांही जुगार खेळूं नका.
मादक पेयांचे सेवन करूं नका.
शील सर्वात श्रेष्ठ आहे.
असल्याच तर गुप्त गोष्टी फोडूं नका.
शक्यतोंवर कर्ज काढूं नका.
संसार चालविण्याची ऐपत येईपर्यंत
लग्न करुं नका.
कोणत्याही माणसाशीं बोलतांना त्याच्या
नजरेशीं नजर भिडवून बोला.
भरभराट होण्याची इच्छा असल्यास
श्रीमंत होण्याची घाई करुं नका.
अंदाज पाहून खर्च करा.
म्हातारपणीं उपयोगी पडावा म्हणून
तारुण्यांत द्रव्यसंचय करा.
मोहाशीं झगडण्यापेक्षां त्यापासून दूर सरा.
कर्जफेडीचा मार्ग काढल्याशिवाय
कर्ज काढूं नका.
अल्प पण अखंड प्राप्ती असल्यास
चित्ताला शांति मिळून खाऊन
पिऊन सुखी रहातां येतें.
सत्संग आणि चांगले संभाषण
सद्गुणांना पोषक होते.
तुमच्या शीलास मोठा धक्का बसण्यास
तुमचीच कृत्यें कारणीभूत होतील.
तुमचें आचरण असें असावें कीं,
तुमच्या निंदकांवर कोणीच विश्वास
ठेवणार नाही.
निजण्यापूर्वी दिवसभर केलेल्या गोष्टींचें
मनन करा.
रिकामे बसूं नका शारीरिक व्यवसाय
नसल्यास मानसिक उन्नतीकरितां
झटा.

**वरील वचनें आठवड्यांतून एकदां तरी काळजीपूर्वक वाचा.**
सचोटी आणि तत्पर सेवा हेच आमचे ब्रीद

कथा

# देवाघरी

• **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे,** (पृष्ठ १२०) भ्रमणध्वनी - २४१५०८८९

सकाळी आईने, 'अग मीनू, अुठ लवकर, आवरून शाळेत जायचे आहे ना? स्कूल बस चुकेल हं!' अशा हाका मारत अुठवले. बिचारी मीनू स्कूल बस चुकेल या धास्तीने आणि शाळेत पोहोचण्याचा मग प्रॉब्लेम निर्माण होईल म्हणून लगेच आंथरूणातून निमूटपणे अुठून बसली. आईने, 'शहाणं माझं बाळ गुणी' म्हणत तिच्या गालांचा पापा घेत तिला कडेवर उचलून घेतले आणि बेसिनपाशी तोंड धुवायला नेले. आईच्या प्रेमाचा हाच तो क्षण. मीनू अगदी पुरेपुर उपभोगून, लाड करून घ्यायची. सकाळी अुठवताना तिला रोज आईच हवी असायची. घरातील दुसरे कोणी चालायचे नाही. आईने कडेवरून तिच्या पाठीवर प्रेमाचा, मायेचा हात फिरविला की ती खूष व्हायची. आईलाही मीनूला आंजरायला-गोंजरायला आवडत असे. वात्सल्याचा वर्षाव करणारा हा क्षण आई जपत असे. त्यासाठी ती रोज पहाटे अुठून भराभर तिची कामे आवरायची आणि मीनूराणीचे असे प्रेमळपणे गोड स्वागत करायची. मग दिवसभर मायलेकींची ताटातूट. आई नोकरीवर तर मीनू शाळेत.

....'मीनू पोळी-भाजीचा डबा दप्तरात भर आणि बसमधे खायला केक आणि द्राक्षे दिली आहेत. वॉटरबॅगही भरली आहे' असे आईने फर्मावताच मीनूने दप्तरात डबा भरला. स्कूलबस सगळ्या बसवाल्या मुलांना सोडत सोडत, फिरत फिरत घरी येते, उशीर होतो म्हणून बसमधे खायला खाऊ आई तिला देत असे.

स्कूलबसमध्ये मीनू आणि तिच्या मैत्रिणींचा चांगला ग्रुप जमला होता. आपापली घरं येईपर्यंत त्या मनसोक्त गप्पा मारायच्या, एकमेकींचा खाऊ देवाणघेवाण करीत खायच्या. गाण्यांच्या भेंड्या लावायच्या. बसमधून बाहेर बघायच्या. त्यामुळे स्कूलबसचा कंटाळा कधी मीनूला यायचा नाही,

....शाळा सुटल्यावर स्कूलबस सुरू झाली की मधेच रस्त्यावर एक मोठा सिग्नल लागून बराच वेळ त्याठिकाणी बस थांबे. तिथेच कोपऱ्याशी, कॉर्नरला अेक मोठी बिल्डिंग होती, त्याच्या तळाच्या ब्लॉकमधे राहात असलेले आजी-आजोबा अेका मोठ्या, रुंद उघड्या खिडकीपाशी उभे राहात. स्कूलबसमधली मुले त्यांना बस थांबली रे थांबली की, 'आज्जीऽऽ आजोबा' करून हाका मारायची, आजी-आजोबांची जोडी ही प्रेमळपणे मुलांना हसत हसत हात हलवून 'टाटा' करायची. बसमधील त्या साईडची मुलेही या बाजूच्या खिडकीत येऊन आजी-आजोबांना टाटा करण्यासाठी धावत येत. या एवढ्या एकाच निमित्ताने स्कूलबसच्या मुलांच्या हे आजी-आजोबा चांगलेच ओळखीचे झाले होते. जणू त्या मुलांच्यात आणि आजी-आजोबांच्यात खरोखरच नाते असावे असे वाटायचे.

परवा मीनू आईला आग्रह करीत होती, 'अे आई, आज मला शाळा सुटल्यावर आणायला ये ना. खूप दिवसांत तू मला न्यायला आली नाहीस. ऑफिसमधून परस्पर शाळेतच ये. अगं, परवा किनई रिमाची आई तिला न्यायला आली होती तर ती किती 'भाव' खात होती! तू पण ये ना मला न्यायला, येशील...?'

तिच्या आवाजातील आर्जवी व्याकुळता पाहून आई विरघळली.

''मी येईन तुला शाळेत न्यायला पण लागलीच आपण टॅक्सीने घरी जाऊ म्हणजे लवकरच पोहोचू'' असे तिला म्हणाली. त्यावर, ''अगं, मग मला ते आजी-आजोबा कसे दिसतील? त्यांना मी 'टाटा' कसे करीन?''

''कोण गं हे आजी-आजोबा?'' आईने उत्सुकतेने विचारले. ''खूपऽऽ चांगले आहे, खाली एका घरात राहातात आणि खिडकीतून रोऽऽज, न चुकता आम्हा बसमधल्या मुलांना टाटा करतात. तू पण ये त्यांना बघायला. तुलाही आवडतील ते.'' मीनू म्हणाली, 'ते काही नाही, टॅक्सीने नाही आपण जायचं हं, मी नाही येणार तुझ्या बरोबर मग... तू माझ्या स्कूलबसमधूनच आलं पाहिजेस. तुलाही ते आजी-आजोबा आवडतील...!'' मीनूने आपला ठेका चालू ठेवला. त्यावर आई वैतागून म्हणाली, ''पुरे झाले तुझे त्या आजी-आजोबांचे कौतुक, तुला घरी तुझे अगदी सख्खे आजी-आजोबा आहेत ना? मग त्यांची काय एवढी अपूर्वाई?''

आईने असे म्हणताच मीनू एकदम हिरमुसली. तिचा पडेल चेहरा पाहून तिच्या आईला आपण उगाच कठोर बोललो याची लाज वाटली. ती म्हणाली, ''ठीक आहे मीनू, ओ.के. आपण स्कूलबसनं घरी जाऊ. टॅक्सी कॅन्सल.''

''खरंच?'' मीनूचे निरागस डोळे चमकले. तिने टुणकन अुडी मारून आपला आनंद व्यक्त केला.

... स्कूलबसमधे मुलांचा एकच गलका चालू होता. कोणी एकमेकांच्या खोड्या काढीत होती, कोणी उगाचच ओरडत होती, काही मुले खिडकीची जागा पटकाविण्यात मश्गूल झाली होती; घर कधी येईल याकडे वाट पाहाणारी मुले एकाकी,

हिरमुसली होऊन बसली होती, बस न आवडणारी मुले उदास, केविलवाणी दिसत होती तर काही या गदारोळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आपण स्कूलबसचे नाहीच अशा अलिप्त, तटस्थ भावनेची निर्विकार मुलेही होती.

...इतक्यात बस मेनरोडवरून एका वळणावरच्या हमरस्त्यावर वळली, तिथे मोठा सिग्नल लागला म्हणून थांबली आणि मुलांनी 'आजीऽऽआजोबा' असा एकच जल्लोष केला. बसमधील त्या साईडची मुले तत्परतेने या साईडला येऊन आजी-आजोबांना टाटा करण्यास सरसावली. हिरवा दिवा लागला. सिग्नल सरू झाला. बस पुढे गेली. मुलांनी आजी-आजोबांना टाटा केला आणि एक प्रकारच्या कृतार्थतेचा, धन्यतेचा भाव, वीज चमकावी तसा क्षणभरच त्यांच्या चेहेऱ्यावर चमकून गेला.

... नियमितपणे बस बरोबर त्यावेळेला सिग्नलपाशी थांबे. आजी-आजोबा खिडकीशी न चुकता या मुलांच्या हाकेला हसून, हात हलवीत त्यांना 'टाटा' करून प्रतिसाद देत.

...क्वचित कधी आजी एकटी खिडकीशी उभी असे मग ताबडतोब मुले विचारीत, 'आजी, आजोबा कुठे?' मुलांच्या ओरडून या विचारण्याने तात्काळ आजोबाही पुढे येत. आजीही, 'अहो, हातातले काम टाकून पहिल्यांदा इकडे या लौकर, ही चिमणी पाखरं साद घालताहेत' असा काहीसा आजोबांना दम देताना दिसे.

त्या दोघांना एकत्र पाहिल्यावर मुलांना समाधान होई.

....'अे आई, टि.व्ही. वरच्या त्या जाहिरातीतल्या आजीसारखी ही आजीही आजोबांच्या पायांना 'कैलासजीवन' लावत असेल का गं?' मीनूने आईला प्रश्न केला.

... आई समाधानाने फक्त हसली. बोलली काही नाही. मीनूने आपले बोलणे चालू ठेवले, 'पण आई, ही आजी म्हातारी असूनही किती सुरेख दिसते नाही? कपाळावर मोठं ठशठशीत लाल कूंकू, गळ्यात काळ्या मण्यांचं मंगळसूत्र, कानात मोत्यांच्या कुड्या आणि तू दादाच्या मुंजीत नाकात नथ घातली होतीस ना, तशीच या आजीच्या नाकातही रोज नथ असते, तिला ती जड कशी होत नाही गं? अंबाड्यावर रोज अबोलीच्या फुलांची वेणी नाहीतर गजरा तरी असतोच. किती हौशी आणि लोभस दिसतेना ही आजी! तिचा प्रेमाने ओथंबलेला चेहरा पाहिला की असे वाटते, बसमधून अुतरून तिला भेटलो तर ती मला जवळ घेऊन, पाठीवरून मायेने हात फिरवील आणि लाडू-करंजी नाहीतर खडीसाखर, चॉकलेट खायला देईल. आपल्या आजीसारखे हिला कधी रागावताच येत नसेल असे वाटते.''

''बसमधून अुतरु-बितरु नकोस हं, क्लीनरचा डोळा चुकवून , आजीला 'टाटा' करतेस तेवढेच पुरे आहे.'' आईने संभाव्य धोका ओळखून मीनूला दटावले खरे पण या लहान वयातही मीनूची निरीक्षणशक्ती, तरतरीतपणा, माणूस ओळखण्याची तिची धडपड हे दुर्मिळ गुण पाहून आईला मनोमन तिचे खरे कौतुकच वाटले आणि ती सुखावली.

... संध्याकाळी बसची वेळ झाली की आजी-आजोबा मुलांची वाट पाहायचे. एखादे दिवशी बसची वाट पाहून पाहून थकायचे मग उशीरा लक्षात यायचे की अरे आज 'अमुक' दिवस, शाळेला सुट्टी असणार, इतकी या गोष्टीची त्यांना सवय झालेली. वृद्धपणातला विरंगुळा होता तो.

परवा मीनू सांगत होती, 'अगं आई आज बस थांबली ना तशी आजीने खूप चॉकलेट्स असलेली प्लॅस्टिकची पिशवी घाईघाईने क्लिनरच्या हातात दिली व बसमधल्या मुलांना चॉकलेट वाटायला त्याला सांगितले. दुसऱ्या दिवशी आम्ही सर्व मुलांनी एकसुरात आजोबांना 'हॅपी बर्थ डे' केले. आजोबा आनंदी दिसले.

सुट्टीत, मीनू खेळण्यात कितीही दंग असली तरी तिला आजोबा-आजींची आठवण येऊन चुकल्याचुकल्यासारखे वाटायचे.

...मीनूच्या आईला संगीताची फार आवड होती. कधी निवांतपण मिळाला, मूडमधे ती असली की घरातील टेपरेकॉर्डवर गाणी ऐकण्याचा तिला छंद होता. परवा अशीच ती 'आवत श्याम लचक चले...' 'कान्हा मैं तोसे हारी छोडो साडी...' ही ठुमरी ऐकण्यात गुंग झाली होती. तोच मीनू रडवेल्या स्वरात सांगत होती, 'आज चार दिवस झाले, आजी-आजोबा दिसतच नाहीत!'

'अग पण गावा-बिवाला गेले असतील ते?' आई समजूतीच्या स्वरात मीनूला जवळ घेऊन म्हणाली.

'अग पण ती मोठ्ठी खिडकी उघडी असते. कधीच बंद लावलेली नसते. गावाला गेले नसणार... आम्ही हाका मारतो, आशेने पाहातो खिडकीशी कुणीही नसते. रागावले की काय आमच्यावर? पण ते आजी-आजोबा 'कट्टी-फू' करणारे नाहीच आहेत मुळी' मीनू विश्वासाने बोलत होती.

... आता मात्र मीनूची आई विचारात पडली. कारण एवढ्या (चार) वर्षांत ते कधी गावाला गेले नव्हते. रोज नेम असल्यासारखे, न चुकता मुलांना टाटा करण्यात त्यांचा कधी खंड पडत नव्हता ते तिला ठाऊक होते. रात्री अधूनमधून जेवायच्या वेळी मीनू आजीआजोबांविषयी सांगत असे तर कधी केवळ कुतूहलापोटी मीनूची आईही त्यांची चौकशी करीत असे.

... रोज स्कूलबसमधल्या मुलांनी आजी-आजोबांना हाका मारल्या तरी त्यांना प्रतिसाद मिळत नसे. उघडी-बोडकी

खिडकी आजी–आजोबांशिवाय रिकामी वाटायची. तरीही मुले न कंटाळता खिडकीकडे पाहून आजी–आजोबांना हाका मारायची. त्यांना आशा होती की आजी–आजोबा खिडकीत येतील आपल्या हाकेला 'ओ' देतील.

... आज दहा दिवस झाले. आजीचे दर्शन काही मुलांना झाले नाही. एखाद्या भाविक भक्ताने लांबून जरी देऊळ दिसले तरी हात जोडावेत त्याप्रमाणे स्कूलबसमधील मुले खिडकी आली की आजीला हाका मारीत पण आजी–आजोबा न दिसल्यामुळे हिरमुसली होत.

... घरकाम, रोजची नोकरी, मुलांचा अभ्यास, मीनूच्या बाबांचे हवे–नको पाहाणे यात मीनूची आई इतकी गुरफटून गेली होती की दिवस कधी उगवतो आणि कधी मावळतो हे ही तिला समजत नसे.

'आई, आज आजी खिडकीत दिसली पण ती एकटीच होती, बरोबर आजोबा नव्हते.' मीनूला ते खटकले. ती पुढे म्हणाली, 'आई आजी आज पूर्वीसारखी छान दिसत नाही.'

'म्हणजे कशी गं?' आईने उत्सुक होऊन विचारले.

'आजी उदास वाटते, आजारी असल्यासारखी दिसते. कपाळावर कुंकू नाही, नाकात नथ नाही, अंबाड्यावर फुलांची वेणीसुद्धा नाही. आजोबा तर अजिबात दिसतच नाहीत मुळी, असे का?' 'अगं, आजोबा देवाघरी गेले मग तुम्हाला ते कसे दिसणार? आईने मीनूने आजीच्या केलेल्या वर्णनावरून हे ओळखले. मीनूला वाईट वाटले.

... थोड्या दिवसानंतर मीनू आईला तक्रारीच्या सूरात सांगू लागली की, आजी हल्ली टाटा करायला पूर्वीसारखी खिडकीत येतच नाही. इतर मुलांनी आजीला हाका मारायचे केव्हाच सोडून दिले आहे. मी आपली मला राहावत नाही म्हणून खिडकी आली की हाक मारते. तशी सर्व मुले मला चिडवितात. पण मी त्या वेड्या मुलांकडे लक्ष देणारच नाही, कधी ना कधी तरी आजी खिडकीत दिसेलच आणि हात हलवून टाटा करेलच!'

... मीनूचा हा आत्मविश्वास आणि प्रेमळपणा पाहून आईला अगदी भरून आले. निरागस मुले किती निर्हेतुकपणे माया करीत असतात, आपल्याला आवडणाऱ्या माणसांवर किती मनापासून जीव लावीत असतात, हे ती अनुभवीत होती.

... अलिकडे बऱ्याच दिवसांत मीनूने आपणहून आजीचा विषय काढला नव्हता तेव्हा आईनेच तिला विचारले, 'काय ग मीनू तुझी आजी काय म्हणतेय?' रडवेली होत मीनू म्हणाली, 'खूप दिवसांत ती भेटलीच नाही ग, मी तिची रोज वाट पाहाते!'

'अग ती आजोबांसारखीच देवाघरी गेली असेल!' आईने शक्यता वर्तवली. तशी मीनूने रागाने दोन्ही गाल फुगवून म्हटले, 'छट् ती काही 'देवाघरी' जाण्याएवढी अजून म्हातारी नाही झाली की, मला कधी तरी भेटेलच!' 'तसं असलं तर आनंदच आहे ग मला!' आई म्हणाली.

... अेके दिवशी सकाळी मीनू झोपेतून अुठून आईला सांगू लागली की, रात्री मला स्वप्नात आजी दिसली. पण टाटा करताना नाही की, आपल्या घरात या कॉटवर बसून चहा पीत होती.'

'असं का? छान झालं मग!' काहीतरी म्हणायचे म्हणून आई म्हणाली. तिला कामे आवरण्याची घाई होती.

... आता मीनू थोडी मोठी झाली होती. त्यामुळे ती स्कूलबसमधून न जाता, कॉलनीतील तिच्या बरोबरीच्या मैत्रिणींबरोबर पायीच शाळेत जाऊ लागली होती.

... सुरुवातीला काढलेल्या चित्राचे गडद रंग कालांतराने फिकट व्हावेत तशी आजीची आठवण पुसट होत चालली होती. शाळा आणि तिचे जग हळूहळू विस्तारत होते. तरीही अधूनमधून ती आजीची आठवण आईजवळ काढीत असे.

... आणि अचानक त्या दिवशी तिन्ही सांजेला मीनूची आई देवापुढे समयी लावून रामरक्षा म्हणत होती. तोच दारावरची घंटी वाजली म्हणून मीनूच्या आईने दार उघडले. 'फिनेल घेता का?' अेक म्हातारी विक्रेती बाई आपल्या ओढग्रस्त आवाजात विचारत होती. मीनूची आई नकारार्थी बोलणार इतक्यात मीनू दरवाजाशी कोण आहे ते डोकावायला धावत आली आणि अेखादी हरविलेली पण चिरपरिचित वस्तू सापडावी त्या आनंदात अेकदम ओरडली, 'अग आजी, ये ना आत घरात, आई तू ओळखले नाहीस, हीच ती आम्हाला स्कूलबसमधून 'टाटा' करणारी आजी असे म्हणत मीनूने हात धरून आजीला कॉटवर बसविलेही.

मीनूची आई अवाक् होऊन पाहातच राहिली. आजीची पूर्वीची रया पार गेली होती. गालफडे वर आली होती. केस संपूर्ण पांढरे झाले होते. अंगात काही त्राण अुरले नव्हते. नेसलेले लुगडेही मळले होते. चेहरा काळवंडला होता. पूर्वीची गौर कांती जाऊन एखाद्या रापलेल्या मजूर, कष्टकरी बाईसारखी आजी दिसत होती.

मीनूने फ्रीजमधील गार पाणी प्यायला दिले, 'आजी तू ओळखलेस का मला? स्कूलबसमधून जात असताना आम्हा मुलांना टाटा करायचीस ती?'

... आजीने फक्त होकारार्थी मान हलवली. तिच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू बाहेर यायला लागले पण तिने ते लगेच आवरले. 'फिनेलची बाटली घेता का विकत? दहा रुपये

किंमत आहे.' असे तिने मीनूच्या आईला विचारले, कॉटवरून ती अुठली तत्परतेने पिशवीतील अेक बाटली काढू लागली.

मीनूच्या आईने विचारले, 'आजी पिशवीत किती बाटल्या आहेत?'

'दहा'. 'तुम्हाला किती हव्यात?'

मीनूच्या आईने शंभराची कोरी नोट आजीला देत सांगितले, 'दहाही बाटल्या ठेवा आम्हाला, आमच्या ऑफीससाठीही मला घ्यायच्याच आहेत.'

... आजीने रिकाम्या पिशवीची घडी केली, पैसे बटव्यात ठेवले आणि ती निघून गेली.

... या प्रकाराने मीनू एकदम खिन्न झाली. तिला मागे पडलेले स्वप्न आठवले ते या प्रकारे सत्य झाले होते पण अशा परिस्थितीत आजीचे आगमन होऊन तिने एखाद्या अपराध्याप्रमाणे चोरटेपणाने कॉटवर बसावे हे पाहून मीनूला गहिवरून आले. कळवळ्याने ती आईला म्हणाली, 'आई, अशा अवस्थेत आजी मला भेटलीच नसती तर किती चांगले झाले असते ग? आई तू रागावू नकोस पण मला वाटते, अशा खडतर दुःखी अवस्थेत आजीने राहाण्यापेक्षा ती देवाघरी गेलेली बरी आजोबांसारखीच...!'

❖

---

# आरोग्यं धनसंपदा-सोनेरी मिश्रण - हळद व मधाचे

• **डॉ. सीमा श्याम मराठे**, पुणे (पृष्ठ ४११) भ्रमणध्वनी - ७५०७९१२९०६



काही आहार द्रव्यांमध्ये असामान्य औषधी गुणधर्म असतात. परंतु आपलं त्याकडे दुर्लक्ष होतं. मी तुम्हाला 'सोनेरी मध' याबद्दल काही माहिती सांगू इच्छिते.

प्रथम 'सोनेरी मध' म्हणजे काय? तो कसा करायचा याबद्दल जाणून घेऊ या.

'सोनेरी मध' म्हणजे दुसरं तिसरं काही नसून हळदीची वस्त्रगाळ पावडर व मध यांचे मिश्रण. घरच्या घरी हे मिश्रण करता येते आणि घरगुती प्रभावी औषध म्हणून त्याचा वापर करता येतो. प्रथम हे मिश्रण कसे करायचे ते पाहू या.

१) ५ औंस (१०० ग्रॅम) शुद्ध मध.

२) १ टेबलस्पून वस्त्रगाळ केलेली हळदीची पावडर.

**कृति** – १०० ग्रॅम मधामध्ये १ टे. स्पून हळद घालून चांगले ढवळावे. मध व हळद एकजीव व्हायला हवेत. नंतर ते मिश्रण एका काचेच्या बाटलीत भरून ठेवावे.

**उपयोग** – सर्दी, फ्ल्यू, श्वसनाचे विकार असल्यास सुरुवातीला हे सोनेरी मधाचे मिश्रण वापरल्यास दुखणे त्वरीत बरे होते. सर्दी, सायन्यूसायटीस झाल्यास खालीलप्रमाणे प्राशन करावे.

**पहिल्या दिवशी** – अर्धा चहाचा चमचा सोनेरी मिश्रण दर तासाला घ्यावे.

**दुसऱ्या दिवशी** – अर्धा टी स्पून दर दोन तासांनी घ्यावे.

**तिसऱ्या दिवशी** – अर्धा टी स्पून दिवसातून तीन वेळा.

हे मिश्रण तोंडात घेतल्यानंतर जरा वेळ तोंडात ठेवावे. जिभेने ते पसरावे. लाळेमध्ये संपूर्णपणे विरघळल्यानंतर गिळावे. अशा तऱ्हेने प्राशन केल्यास सर्दीसारखे विकार पूर्णपणे बरे होतात. एवढेच नाही तर सर्दीपासून होणारे इतर रोगही होत नाहीत. सर्व तऱ्हेच्या श्वसनाचे विकार टाळले जातात.

हे एक टी स्पून मध व हळदीचे मिश्रण चहा किंवा नारळाच्या दुधात घालून नियमित घेतल्यास ब्लडप्रेशर कमी होते. हायपर टेन्शन असणाऱ्या व्यक्तिंनी हे वापरावे. शिवाय हळदीमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. डायबिटीस असणाऱ्या रूग्णांना खूप उपयोगी आहे.

हे एक टी स्पून मिश्रण जेवणापूर्वी घेतल्यास घसा, श्वसनाचे विकार टाळले जातात. जेवणाबरोबर घेतल्यास अन्न पचन चांगले होते. जेवणानंतर घेतल्यास किडनी व युरीनरी प्रॉब्लेम्स् होत नाहीत असे म्हटले जाते.

हळदीचे गुण आपण जाणतोच. त्यामध्ये मुख्य द्रव्य आहे पॉलीफेनॉल (Ployphenol) आणि जवळ जवळ १५० औषधी गुणधर्म त्यात आहेत. नैसर्गिक ॲन्टीबायोटीक असून जखमा बऱ्या करण्याचा गुणही आहे. त्वचेवर सूज व लाली आल्यास कमी होते. हळद व मध यांचे मिश्रण Anti Carcinogenic, म्हणजेच कॅन्सर होण्यास प्रतिबंध करते. यासाठी सकाळी अनशापोटी एक टी स्पून मिश्रण पाव कप कोमट पाण्यातून घ्यावे. अशा विविध प्रकारे हे नैसर्गिक मिश्रण घरच्या घरी वापरण्यास योग्य आहे.

पित्ताशयाचे विकार असल्यास मात्र हे मिश्रण घेवू नये.

❖

# समस्त साठीजनांसाठी विचारांची ही बळकट काठी

• **सौ. निलिमा विष्णू विद्वांस**, बदलापूर (पृष्ठ ६५८) भ्रमणध्वनी - ९८६०८३४८६१

आपल्या साठी पूर्ततेला, म्हणजेच नव्या वर्षात पदार्पण केलेत म्हणून मनःपूर्वक भरभरून रंगीबेरंगी शुभेच्छा.

इतकी वर्षे आपण नोकरीच्या घाण्याला पाठीवर जू ठेवून जुंपले होतात त्यातून सन्मानपूर्वक सरकारने आपल्याला मुक्त केले आणि इतकी वर्षे एकाच नोकरीच्या कामाचा सतत विचार असल्याने इतरत्र कुठेही वेळेअभावी लक्ष देता येत नव्हते पण आता भरपूर वेळचवेळ असल्याने आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी मिळते आहे त्याचा आपण पुरेपूर उपयोग करू शकतो.

रोजचे घाईचे कार्यक्रम संपले. गाडी गाठण्याची घाई संपली. अर्थात थोडे दिवस हे रिकामपण जड जाईल अथवा ते वेळापत्रक शरिरात भिनल्याने त्याची काही दिवस तीव्रतेने आठवण येईल पण तेही मागे पडेल आणि वेळ सत्कारणी लावू शकाल. घाई केलीत तर ''आता कुठे तुम्हांला गाडी गाठून वेळेवर पोहोचायचे आहे? असा खडा सवाल होऊ शकेल म्हणून सबुरी ठेवा. पण एक लक्षात ठेवा आपला सल्ला अगदी फुकटचा असला तरी तो कुणालाही नको असतो. कारण जो तो शहाणासुरता कमवता असतो आणि अक्कलवानही. त्यामुळे आपल्या सल्ल्याची कुणालाही गरज नसते. विचारले तर जरूर मार्गदर्शन करावे. नाहीतर आपला वेळ आपल्या कला वाढविण्यात घालवावा किंवा आवडत्या कामात. सकाळीच सूर्यदर्शन, झाडा माडांचे शीतल दर्शन, सुगंधीत ताजा वास ह्याने आपले मन आनंदीत होऊन शरीर ही आरोग्यदायक होऊ शकते. दिवसाची सुरुवात चांगली झाली की कामांना हुरूप येतो. दुपारची वामकुक्षी जुन्या आठवणींना उजाळा देते. संध्याकाळचा सूर्यदेव निरोप देतानांही आकाशात अनेक रंगांची उधळण करून मनमोहून टाकतो. पण नंतरची कातरवेळ जीवाला हुरहुर लावते. आठवणींचा घडा रिकामा होतो पण नंतरच्या वेळात टी.व्ही. गप्पा, वाचन ह्यानी थोडी करमणुक होऊन जाते.

दिवसाचा आराखडा आखावा किंवा नाही हा वैयक्तिक प्रश्न आहे. पण वेळ कामी लावू शकतो. एखाद्याला अर्ज लिहून देणे, दवाखान्यात नेणे, औषधे किंवा काही जरूरीच्या वस्तू आणून देणे. काही वेळेस एखाद्याची मानसिक स्थिती बिघडल्याने तो बैचेन असल्यावर त्याला जर सल्ला दिला तर नकळत त्याचे जीवन आपण मार्गी लावू शकतो. म्हणजेच तेव्हा आपला सल्ला त्याला मोलाचा वाटू शकतो. अनेकांना हर तऱ्हेने मदत करून समाजसेवा ही घडू शकते. निर्लोभपणे त्याचा निर्भेळ आनंद आपण मिळवू शकतो. मानसिक रूग्णांशी मजेशीर गप्पा मारून त्यांना हसवून त्यांची करमणूक करून तेवढी वेळ आपण निभावू शकतो. त्याचे हसू आपले समाधान असते. आपल्या विनोदाने, सद्‌विचाराने एखादा आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त होऊ शकतो. त्याला आपला आधार वाटून तो आपल्याला देवदूत समजतो.

सहकारी, नातेवाईक शेजारी यांना अन्यप्रकारे मदत करून वेळ निभावलेली असते. पण आता वेळ आहेच तर इतरत्र ही पाहा. निसर्गातील पशुपक्षी त्यांचे जीवन ह्याचे निरीक्षण केल्याने आपणास आवड वाटून करमणूक होऊ शकते. त्यांच्याकडून खूप काही शिकू शकतो. पाहाच पाहा म्हणजे त्यातील मर्म कळेल. तसेच मांजरे, श्वान ह्यांनाही खायला घालून देण्यातला आनंद आपण मिळवू शकतो. खाण्याचा आनंद, कृतज्ञता ते डोळ्यातून, शेपूट हलवून मनापासून खरी खरी व्यक्त करतात. अर्थात आपण हे डोळसपणे केले, पाहिले तरच कळू शकते. ते प्राणी आपल्यावर निर्व्याजपणे प्रेम करतात. एकदा जरी तुम्ही त्यांना दिलेत तरी ते विसरत नाही. पोट भरलेल्यांना देण्यापेक्षा भुकेल्यांना द्यावे. मग तो कोणीही असो.

आपण जर आपल्या माणसांच्या उपयोगी पडलो. चार कामे केली तर आपण खूप चांगले ठरतो पण चांगले काही सांगितले तर 'नसता शहाणपणा शिकवतात' असा टोमणा ऐकू येण्याची शक्यता असते. म्हणून संयम ठेवून मानाने राहू शकू असे आपण वागले पाहिजे. सर्वात उत्तम म्हणजे कुणालाही वेडेवाकडे न बोलणे. 'सारेच छान आहे' हे वाक्य आपले जीवन सुसह्य करू शकते. नको ते न बोलण्याने आपण देवमाणूस ठरू शकतो. ह्याचा परिणाम आपण आनंदी राहून इतरांनाही आनंद देऊ शकतो. साठी नंतर आपण संयम ठेवला तर ती नाठी बुद्धी न ठरता अनुभवाची बळकट काठी ठरू शकते. भलेपण पदरी येते. आनंदीत आरोग्यदायक जगण्यासाठी संयमाची कटू न बोलण्याची सवय लावून घेतली तर ''साठी'' पुढील आयुष्य सुसह्य होऊ शकते. हे माझे साठीतील मनोगत आहे. हा न

विचारलेला सल्ला नाही. हे विचार आचरणात आणते म्हणूनच हे लिहीण्याचे धाडस केले. आधी केले मग सांगितले. मोठ्या वयाच्या माणसांकडून अनुभव, ज्ञान जसे मिळते तसेच लहान वयातील लोकांकडून ही बरेच शिक्षण मिळते. डोळसपणे वावरले म्हणजे सारे आकलन होते. त्या व्यक्तिंनी एखादा अनुभव, सल्ला दिला तर मोठ्या वयाने, मोठ्या मनाने त्याचा आनंदाने स्वीकार ही करावा. त्याचे पटले असूनही लहान म्हणून दुर्लक्ष न करता सरळ त्याचे कौतुक करावे. त्यानेच आपण मोठे ठरू शकतो. मान ठेवला तर मान मिळतो हे सत्य आहे. द्याल तर घ्याल हा निसर्ग नियम आहे. आपले वागणे असे असावे जेणेकरून इतर आपला आदर करतील. मोठ्या मनाने राहिला तर मोठेपणा मिळतो. नुसते वय मोठे असून माणूस मोठा होत नसतो. त्यासाठी कष्टाची, देण्याची, क्षमा करण्याची प्रवृत्ती हवी. वयाबरोबर मोठ्या अकलेची ही वाढ होणे आवश्यक असते. मान मागून मिळत नसतो.

तरूणांनी आपल्या घरातील तसेच आजूबाजूच्या थोरांकडून त्यांच्या अनुभवाचा फायदा जरूर घ्यावा. साठीच्या आतील लोकांनासुद्धा हे अनुभव लाभदायक ठरू शकतील. मोठ्यांचा सल्ला, मत घ्यावे. विचारांती ते पटूनही जाते. पण दुर्लक्ष, अवेहलना करू नका. आपण ही पुढे वयस्कर होणार हे वारंवार लक्षात ठेवावे. कराल ते भराल हा ही एक नियम आहे.

लहान मुंग्याकडून शिस्त, मिळू शकते, कावळ्यांकडून समाज एकत्रतेचा पाठ मिळतो. श्वान प्राण्याकडून कृतज्ञता घेऊ शकतो. अगदी लहान बाळाकडून ही बरेच शिकता येते. हे सारे सर्व लहान थोरांनी अंगी बाणले तर उर्वरीत जीवन नक्कीच सुसह्य होऊ शकते. बघा नीट विचार मनन करूनच काय ते ठरवा. 'साठी बुद्धी नाठी' असे नसून ती विचारांची बळकट काठी आहे.

समस्त 'साठी जनांनो' ह्या पुढील आयुष्य सुखासमाधानाचे आरोग्याचे आनंदाचे जावो हीच ईश्वरचरणी मनापासून प्रार्थना'.

❖

# केल्याने देशाटन

• **हेमंत अरुण मराठे**, नालासोपारा (पृष्ठ २१) भ्रमणध्वनी : ९२२०६९९९५७

१ ऑगस्ट २०१६ रोजी रात्री मी प्रथमच आपल्या देशाबाहेर जाण्यासाठी विमानतळावर पोहोचलो. विदेशी जाण्याची पहिलीच वेळ, त्यामुळे उत्सुकता होतीच. माझा मोठा भाऊ निरोप देण्यासाठी आला होता. सर्व सोपस्कार आटोपून ११.३५ वा विमानात स्थानापन्न झालो.

पहाटे बँकॉक विमानतळावर उतरलो. केवढा मोठा तो विमानतळ! येथील व्हिसासह सर्व सोपस्कार पार पाडून बाहेर पडलो आणी वेगळेपण जाणवू लागले. बस मधून आम्ही पटायाकडे निघालो. प्रचंड फ्लॅयओव्हरस्, शिस्तबद्ध वाहतूक, वेगनियम कसोशीने पाळणे, लेन न तोडणे, हॉर्न अजिबात न वाजवणे, थोडक्यात स्वयंशिस्त पाहुन खुपच फरक जाणवला. मिनिटामिनिटाला आपल्या येथील लोकाचे ड्रायव्हिंग आठवत होते.

पटाया मध्ये दोन दिवस फिरलो परंतु माझ्यावर प्रभाव पडला तो तेथील लोकांचा. कमालीचा नम्रपणा, कामाप्रती निष्ठा, प्रत्येक कामाला प्रतिष्ठा हे पाहून आनंद झाला. देश जास्त करुन पर्यटनावर अवलंबून आहे त्यामुळे सरकारबरोबर लोकही निष्ठेने काम करत असलेले दिसतात. पर्यटक नाराज होऊ नये परंतु तिथले नियमही मोडू नयेत ह्याची जाणीव गोड भाषेत पर्यटकांना करुन दिली जाते. हे सर्व पाहून एक लक्षात आले कि कोणतीही गोष्ट यशस्वी करायची असेल तर जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे. आपल्या देशात सरकार व जनता वेगवेगळी असते. हा माझा देश आहे, हा स्वच्छ रहावा याची काळजी मी स्वत: घेतली पहिजे, सगळे नियम स्वत: पाळले पाहिजेत ही जाणीव आपल्या लोकांना अजिबात नाही. हा फरक खुप प्रकर्षाने जाणवतो.

तुम्हाला वाटेल प्रवास वर्णन करायचे सोडून हे काय? परंतु जे जाणवले ते सांगितले. कारण सध्या आपल्या लोकांची शिस्त(?) पाहून कीव करावीशी वाटते. बाकी हवामान साधारण आपल्यासारखेच आहे. निसर्ग सौंदर्य म्हटले तर आपल्या देशात ते ठासून भरलेय परंतु आपणाला त्याची किंमत नाही म्हणून आपले लोक कोठेही पर्यटनाला गेले की सगळीकडे कचरा करतात.

एवढासा देश परंतु जगातील सगळ्या देशातील पर्यटक इकडे आकर्षित होण्याचे कारण या देशातील लोकांचे मी केलेले वरील अवलोकन व विश्लेषण. ❖

# आमची पंचाहत्तरी

• **श्री. वा.ग. मराठे**, पुणे (पृष्ठ ५०३) दूरध्वनी - ०२०-२५८६१७००

*आम्ही इकडे आहोत पाहुणे।*
*पाहायाचे नाही काही उणे दुणे।।*
*ठेवायचे नाही कुणाचे देणे।*
*मात्र द्यायाचे एकमेकां खांदा देणे।।*
*निश्चल मनाने हुंदका आवरून।*
*पाऊल टाकावें स्मशानाचे भान राखून।।*

आपण इस्पितळात जातो, केसपेपर काढतो, सर्व सोपस्कार होतात. सगेसोयरे येतात जातात. भेटण्याची वेळ संपते. पुन्हा आपण एकटे एकटे. अंधार सोबती. खरोखर उद्या आपण असू का? हा विचार कुठल्याही पेशंटच्या मनात डोकावतो ना? नसल्यास जरा अंतर्मुख होऊन विचार करा अन् काय वाटते ते पाहा!

ह्या जगात येणारे सर्व जीव किडे, मुंगळे, पशु पक्षी ते सगळेच वळवळणारे किडे असतात. कोणी शेणात बनतात तर कोणी गटारात. फरक एवढाच की कुणाला सावली मिळते तर कुणाला रखरखीत उन्हाळा.

सगळ्याच म्हाताऱ्यांना टक्कल नसते व म्हणून का कुणाला अक्कल नसते. परंतु अक्कल हुषारीने ते आपापली कामे बहुतेक लोक पार पाडत असतात. जरी ते किरकोळ वाटत असले तरी शक्तिपेक्षा युक्तिनेच आपले कार्यक्रम पार पाडत असतात. फरक एवढाच की ते संयमाने, शिस्तीने, विचारपूर्वक व्यूह रचून व अनुभव संपन्न असल्याने आणि बोटे मोडून गणिते मांडतात व आपले उत्तर बरोबर शोधतात. पण नवी पिढी बटणाने सर्वच व्यवहार करतात.

भाकरी ही आईच करू शकते आणि पिझ्झा मुलगी! न करता मशीन (ओव्हन) बनवू शकते. नवीन पिढी भाकरी चावू शकणार नाही. कारण त्यांना दात येण्यापूर्वीपासून आईस्क्रीम चावायची संवय असते. आम्हां सर्वांवर संस्कार झालेले असतात. त्या संस्काराची मुळें वडा पिंपळासारखी खोलवर गेलेली असतात व त्यावरच आपण तग धरून राहातो. म्हणूनच म्हणतो आपण १ तारखेला सकाळी वहीपूजन करून 'दैनंदिनी' लिहायला दैनिक कार्यक्रम लिहायला सुरुवात करूया.

ती दैनंदिनी कशी काय लिहिणार? थांबा... जरासं डोकं खाजवा. विचार करा. पेन्सिल, रबर, पेन घ्या. लाल पेन्सिल, मार्कर घ्या एक पेपरवर स्केच करा, साधकबाधक विचार करा, काय लिहावयाचे ते पूर्ण विचारांनी ठरवा कारण आपला शत्रू ''स्मरणशक्ती' होय. म्हातारपणी काठी आधार देते आणि स्मरणशक्ती दगा देते. त्याला दूर ठेवायचे असेल तर आपण दैनंदिनीचे अस्र जवळ ठेवणे अगत्याचे आहे हे विसरू नका. ती जवळ ठेवा, जिवापलिकडे जपा व नियमाने गोळी सारखी चघळत बसा.

**आता दिवसाचा कार्यक्रम**

प्रार्थना, आन्हिक कर्म, प्रभात फेरी, नाश्ता, कौटुंबिक विचारपूस, पेपर वाचन, शिक्षण, जेवण, औषधपाणी, पेन्शन, सँकिंग प्रवास (गमतीजमती) अनुभव बरे वाईट, आपले स्थान. संध्याकाळचे फिरणे, व्यायाम, रात्रीचे प्रित भोजन, दैनंदिनी लिहिणे, प्रार्थना, ''Good Night''.

आपण जेव्हा झोपून उठू त्या वेळपासून कार्यक्रम घड्याळाच्या तासाप्रमाणे उपक्रम आखावा. रात्री दैनंदिनी लिहून नवीन नोंद ठेवावी आणि रात्रौ ११ वाजता परमेश्वराची प्रार्थना करून **''उद्या मी असेन किंवा नसेन''** म्हणून प्रेमपूर्वक त्या जगन्नियंत्याला नमस्कार करून Good Night म्हणावे.

असा प्रत्येक दिवस घालवावा. अशा प्रत्येक क्षणाला, घरात, कुटुंबात, समाजात बरे वाईट प्रसंग येत असतात व त्यातून आपण शेवटपर्यंत शिकत असतो. कारण क्षणाक्षणाला बुकिंगची लाईन पुढे सरकत असते, घड्याळाचे काटे फिरत असतात. आपली मेडिकल फाईल आपल्या उशाजवळ दैनंदिनी जवळच ठेवावी. समोर भिंतीवरचे घड्याळ दिसते. त्याची टिकटिक व आपल्या कृत्याची पिटपिट हीच खरी सोबत असते. शेवट घड्याळच आपला साक्षीदार असते. हे विसरू नका.

❖

## हसा लेको

वॉशिंग्टन विमानतळावरील अधिकारी आगमन कक्षात आलेल्या एका प्रवाशाचा पासपोर्ट पाहातात व विचारतात, अलास्का?

**प्रवासी** : हो, आताच आलो, नवीन नोकरी लागल्ये?


--------

**नवरा** : अर्धशिशी झाल्यासारखं वाटतंय.

**बायको** : जेवढं असेल तेवढंच दुखणार ना...!

# तुम्हे न भुलेंगे रफी

**• सुधाकर (बाळ) दत्तात्रय मराठे**, पुणे (पृ. २५२) भ्रमणध्वनी : ९८२२३२९७७०



पहाडी, मधाळ, कोमल, अल्लड, खट्याळ अशा अनेक वैशिष्ट्यांचा आवाज असलेले गायक महंमद रफी! २४ डिसेंबर हा त्यांचा जन्मदिवस तर ३१ जुलै हा स्मृतिदिन. गाण्याचे कोणतेही ज्ञान, अभ्यास नसलेला सर्वसामान्य श्रोताही लिलया गुणगुणू शकेल अशी असंख्य गाणी गाणाऱ्या महान गायक रफींना कोणीतरी विसरू शकेल का?

आज साठीच्या घरात असलेली माझ्यासारख्यांची पिढी तर रफीच्या आवाजावर आजही फिदा आहेच. त्याकाळी फक्त रेडिओ हेच मनोरंजनाचे साधन होते. त्यामुळे रफी, मुकेश, आशा, लता, किशोर, मन्ना डे अशा एकापेक्षा एक महान गायकांची गाणी ऐकण्यात व त्या त्या प्रसंगात श्रोता रमून जात असे. रफीसुद्धा अशाच महान गायकांपैकी एक.

रफींची हजारो गाणी आजही तितक्याच ताकदीची व ताजीच वाटतात. गाण्याचा प्रकार कोणताही असो गझल, दुःखद, मेलडी, मस्तीभरी, भजन, भक्तीरसांची, वरच्या वा खालच्या पट्टीतील, रागदारीची. रफींचा प्रत्येक सूर त्या त्या गाण्यालाच नव्हे तर ते गाणे ज्याच्यावर चित्रीत झाले त्याला साजेसेच असे. पूर्वी सिनेमातील गाणी नायक किंवा नायिका स्वतःच गात असत. पण रफीने नायकांना उसना आवाज तर दिलाच पण हुबेहुब तो नायक किंवा सहनायक ही प्रेक्षकांच्या नजरेसमोर उभा केला.

विनोदी नट जॉनी वॉकर असो (सर जो तेरा चकराये – प्यासा), की रंगिला शम्मी कपूर (ये चाँदसा रोशन चेहरा – कश्मिर की कली), वेगळ्या ढंगाचा मेहमूद असो (हम काले है तो क्या हुआ – गुमनाम) की मद्यधुंद अवस्थेतील नायक, राजकुमार असो (छू लेने दो नाजूक होटोंको – काजल) संगीतकार कोणीही असो, माझ्यासारख्या 'कान'सेनांना अशी गाणी म्हणजे मेजवानीच! अशी विविधता आपल्या गाण्यात असणारा गायक अपवादानेच असेल.

संगीत हा भारतीय चित्रपट सृष्टीचा अविभाज्य भाग आहे, आणि त्यात रफींचे स्थान अद्वितीय असेच आहे.

रफींनी आशा, लता बरोबर व एकट्यानेही गायलेली असंख्य गाणी सर्वश्रूत आहेतच. पण इतर प्रसिद्ध गायकांबरोबर गायलेली गाणी ही तितकीच लोकप्रिय आहेत. सहगायक कोणीही असला तरी रफी त्या गाण्यावरही प्रचंड मेहनत घेत असत.

तलत महंमद बरोबरचे गमकी अंधेरी रात मे – सुशिला, किशोर बरोबर यादों की बारात निकली है – यादोंकी बारात, मुकेश सह सात अजुबे इस दुनियामे – धरमवीर, मन्ना डे बरोबरचे दो दिवाने दिलके चले है देखो मिलके – जोहर, मेहमूद इन गोवा, महेंद्र कपूरसह कैसी हसीन आज चाँदनी रात है – आदमी, आर. डी. बरोबर यम्मा यम्मा – शान, भूपेंद्र सह बडी मस्तानी है मेरी मेहबूबा – जीने की राह किंवा होके मजबूर मुझे किसने बुलाया होगा – हकीकत इत्यादि गाणी वेगळाच आनंद देतात.

स्री गायिकांमध्येही गीता दत्त बरोबर (आँखो ही आँखोमे – सी.आय.डी) मुबारक बेगम सह (मुझको अपने गले लगालो – हमराही) शारदा बरोबरचे (जाने चमन शोला बदन – गुमनाम) शमशाद बेगम सह (लेके पहला पहला प्यार – सी.आय.डी) सुमन कल्याणपूर बरोबरचे (आज कल तेरे मेरे प्यार के – ब्रह्मचारी) किंवा (अज हू ना आये बालमा – साँज और सवेरा) इत्यादी गाणी तर केवळ अविस्मरणीयच.

आपल्या प्रत्यक्ष जीवनात महान गायक असलेल्या किशोर कुमारसाठी ही रफीने आवाज दिला आहे (अजब है दास्ताँ तेरी ये जिंदगी – शरारत) तर मुकेश म्हणजेच राज कपूर असे समीकरण असतानाही रफीने राज कपूरलाही आपला आवाज दिला आहे. (मैं जिंदगीमें हरदम रोता ही रहा हूँ – बरसात) हे गाणे बॅकग्राऊंड वर आहे.

खरंतर रफींबद्दल कितीही लिहीणे वा त्यांच्या सर्वच गाण्यांचा उल्लेख छोट्याशा लेखात येणे अशक्यच आहे. त्यांच्या स्वभावाबद्दल, माणुसकीबद्दल इतरांना मदत करण्याबद्दल, सांभाळून घेण्याबाबत अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. कोणत्याही संगीतकाराला ते नकार देत नसत किंवा एखादे चांगले गाणे ते अगदी कमी मोबदल्यातही गात असत, या व अशा अनेक पैलूंचे लिखाण एखाद्या मोठ्या पुस्तकातही मावणार नाही.

अभिजात हिंदुस्तानी संगीताचा भक्कम पाया आत्मसात करून एकसे बढकर एक गाणी गाणारे, असंख्य गीतकार आणि संगीतकारांच्या रचनांना, अजरामर करणारे रफी हे भारतीय चित्रपट संगीतामध्ये 'सुवर्णयुग' निर्माण करणारे महान गायक, विविध रागदारी लिलया गाणारे 'सूर सम्राट'च होते.

सुप्रसिद्ध संगीतकार नौशाद अली स्वतःच म्हणत असत की

'रफी म्हणजे माझ्या संगीतातील 'आठवा' सूर होता 'आठवा' सूर!

सर्वसामान्य रसिकांच्या मनात ज्याच्या गायनाने फक्त आनंदच निर्माण केला, मानवी मनाचे असंख्य कंगोरे ज्याच्या गाण्यातून समजू लागले असा स्वर्गीय आनंद देणारा 'सूर सम्राट' पुन्हा होणे नाही. त्यांच्या शेकडो गाण्यात सर्वात चांगले गाणे कोणते हे माझ्यासारख्या सामान्य रसिकाला समजणारच नाही, पण त्यांची असंख्य गाणी आणि त्या गाण्यांची मोहिनी ही आगळीच आहे.

काही जण हे जग सोडून गेले तरी त्यांची जागा कोणीतरी घेतोच पण रफीसारख्यांची जागा कोणी घेणे केवळ अशक्य.

** या लेखनासाठी 'मेरे गीत तुम्हारे' या अजित प्रधान संपादित व 'आठवणी मो. रफींच्या - संपादक श्रीधर कुलकर्णी या पुस्तकांचे साहाय्य घेण्यात आले आहे. त्यांचे आभार!*

❖

# समृद्ध निवेदनाचा आनंद वाटणारा बादशहा हरपला

## कै. भाऊ मराठे यांचे दुःखद निधन



सुप्रसिद्ध निवेदक सदानंद विष्णु तथा भाऊ मराठे (पृ.५०७) यांचे दि. २६ ऑगस्ट २०१६ला अल्पशा आजाराने राहत्या घरी दुःखद निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या मागे त्यांची मुलगी सौ. आसावरी, जावई, नातू असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानवर भाऊंचा अपार लोभ होता. प्रतिष्ठानचे कार्यक्रम भाऊ मोठ्या उत्साहाने अंगावर घेत आणि उत्साहात दणक्यात साजरे करीत. त्यांच्या ओळखीमुळे अनेक मोठमोठे कलाकार, मान्यवर अधिकारी व्यक्ती कार्यक्रमाला भाऊ उपलब्ध करून देत. भाऊंवरच्या प्रेमामुळे, भाऊंना नकार देणे त्यांना जमत नसे. त्यामुळे प्रतिष्ठानला त्याचा लाभ होत असे. अत्यंत उमदे व्यक्तिमत्त्व, हसत-खेळत मैफल जमविण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. प्रतिष्ठानच्या बैठकीला भाऊ आले की, वातावरण प्रसन्न, आनंदी, हसते-खेळते व्हायचे. मोकळेपणी गप्पा मारायचे, अनेक किस्से, विनोद सांगायचे. कुठेही 'मोठेपणा' मिरवायचा तोरा त्यांच्यापाशी नव्हता. मराठे म्हणजे आपण सगळे 'स्वयंभू' असे म्हणून दिलखुलास हसायचे. 'हितगुज'च्या अमृतमहोत्सवी ७५व्या अंकासाठी मराठे परिवारातील अनेक मान्यवरांच्या दिलखुलास मुलाखती घेतल्या. 'हितगुज'साठी पुष्कळ जाहिराती मिळवून देऊन आर्थिक मदतही केली. भाऊंच्या अध्यक्षतेखाली 'कलामंच' स्थापन केला होता. मराठे परिवारातील कलाकार, गायक, वादक इ. मंडळींना मार्गदर्शन करीत असत. स्वच्छ वाणी, संस्कृतचे संस्कार, जिभेवर त्यांच्या आईने केले. आईला श्रेय देतात. त्यांचा भारदस्त आवाज कार्यक्रमानंतरही रसिकांच्या मनावर आधिराज्य करीत असे. वाचन अफाट होते. हितगुजच्या १००व्या अंकात मी त्यांची स्वतंत्र मुलाखत घेतली होती. त्यांना ती अतिशय आवडली होती.

त्यांचे हस्ताक्षरही उत्तम होते. कै. चिंतामण बळवंत स्मृती हस्ताक्षर स्पर्धेत त्यांना पहिले पारितोषिक मिळाले होते.

असे हे भाऊ आज आपल्यात नाहीत, हे मानायला मन तयार होत नाही. पण शेवटी ते सत्य आहे. 'उडे अंतराळी आत्मा सोडूनि पसारा...' असे भाऊ परलोकात गेले आहेत.

कै. भाऊंना भावपूर्ण श्रद्धांजली समस्त मराठे कुलबांधव वाहत आहेत.

❖

# खसखशीचा मळा

**पिढीजात**

विजय – विनय, डॉ. जाधव तुमचे तीन पिढ्यांचे फॅमिली डॉक्टर आहेत हे तू कशावरून म्हणतोस?

विनय – अरे, माझे पणजोबा, आजोबा, वडील यांना त्यांच्या हातूनच मरण आले.

**फुलस्टॉप**

भाऊजी – वहिनी आता घरातल्या लोकांची ओळख करून द्या.

वहिनी – हे माझे वडील, ही आई, हे माझे पती, हा थोरला मुलगा, ही धाकटी मुलगी.

भाऊजी – पुढे....?

वहिनी – इश्श्यं, पुढे काही नाही...!

**प्रेषक – वि.म.मराठे, सांगली**

# संवाद कुलबांधवांशी

• **हेमंत अरुण मराठे**, नालासोपारा (पृष्ठ २१) भ्रमणध्वनी : ९२२०६९९९५७

नमस्कार, कुलबांधव भगिनींनो.

सद्य कार्यकारिणी ऑगस्ट २०१३ मध्ये कार्यान्वित झाली व माझ्यावर कार्यवाहपदाची जबाबदारी आली.तेव्हापासून आपला संवाद सुरू झाला. बघता बघता तीन वर्षे झाली. नवीन कार्यकारिणीची निवड होईल आता. त्यामुळे यावेळी गेल्या तीन वर्षांमधे आम्ही कार्यकारिणीतर्फे कार्याध्यक्ष रमाकांतजी विद्वांस यांच्या नेतृत्वाखाली काय कार्य केले त्याचा आढावा घेणार आहे.

याआधीच्या कार्यकारिणीच्या कामकाजात ज्या त्रुटी आहेत असे वाटले, त्या येत्या तीन वर्षात शक्य तेवढ्या दूर करून नवीन कार्यकारिणीच्या हाती सुसूत्रीत कार्यभार सोपवावा या उद्देशाने कामांची आखणी व विभागणी करण्याचा चंग बांधला.

पहिले काम हाती घेतले म.प्र.चे नोंदणी प्रमाणपत्र जे गहाळ झाले असे सांगितले जात होते त्याची प्रत मिळवणे. त्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची पूर्तता करुन एक ते दीड महिन्यामधे धर्मादाय आयुक्तांकडुन प्रत मिळवली. त्याचबरोबर दुसरे काम सुरू केले ते म्हणजे हिशेबांत नियमितता व सुसूत्रता आणणे. विविध कारणांमुळे आयकर विवरणपत्रे दाखल न झाल्याने पुढील विवरणपत्रे वेळेत दाखल करण्याची नैतिक जबाबदारीही होतीच. मूळ PANCARD गहाळ झाल्याने उद्भवलेल्या या परिस्थितीत Duplicate PANCARD साठी लागणाऱ्या प्रक्रियांची पूर्तता करून ते एक दीड महिन्याच्या कालावधीत मिळवले. ऑगस्ट २०१५च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या बहुतेक सर्व शंकांचे समाधानपूर्वक निरसन करता आले. एप्रिल २०१५ पर्यंत मागील दोन वर्षांची म्हणजे आर्थिक वर्षे २०१२-१३ व २०१३-१४ ची आयकर विवरणे दाखल केली गेली. त्या वर्षीचे म्हणजे आर्थिक वर्ष २०१४-१५ चे आयकर विवरण पत्र मुदत टाळण्याच्या आत दाखल केले गेले. 'Trust Deed'ची मुळ प्रत धर्मादाय आयुक्त कार्यालयातून मिळवली. आयकर विभागाचे कलम १२अ सर्टिफिकेट म.प्र. नोंदणी झाल्यानंतर घेतले गेले असावे असे वाटते असे श्री. वा. ग. मराठे यांनी सांगितल्यावरून आयकर सल्लागार यांच्यामार्फत शोध घेऊन आयकर खात्यातून त्याची प्रत मिळवली.

याचबरोबर गेली बरीच वर्षे आम्ही पहात होतो की आपल्या ताळेबंदामधे बरेच निधि वेगवेगळ्या नावांनी दिसत आहेत मात्र त्यातील बऱ्याच निधिंचा विनियोग होतच नाही. सन २०१४ च्या वार्षिक सभेमधे हा विषय ठेवला गेला. त्यानंतर वर्षभरामधे त्यावर योग्य तो विचारविनिमय करुन सन २०१५ चा वार्षिक सभेमधे निधि एकत्रिकरणाचा विषय सभेसमोर ठेवण्यात आला व त्यावर चर्चा करुन मंजुर करण्यात आला. आता सर्व लक्ष महत्त्वाच्या दोन उद्दिष्टांवर म्हणजे वैद्यकीय मदत व शैक्षणिक मदत यावर केंद्रित केले आहे त्यामुळे हे निधि वैद्यकीय निधि व शैक्षणिक निधि या नावाने ओळखले जातील. याव्यतिरिक्त कायम निधि व हितगुज निधि हे असतील. विनियोग होत नसलेले निधि बंद करुन त्यातील रक्कम या दोन निधिमधे वर्ग करण्यात आली त्यामुळे दोनच गोष्टींवर पूर्ण लक्ष केंद्रित करता येईल.

या तांत्रिक बाबींसोबत या कालावधीत कुलबांधवांना एकत्र येण्याची संधी मिळावी म्हणून बरेच कार्यक्रम आयोजित केले गेले. आपले लाडके मुखपत्र हितगुज, याच्या शंभराव्या अंकाचा प्रकाशन सोहळा डिसेंबर २०१४ मधे संगीतकार श्री. यशवंत देव यांच्या हस्ते व श्री. शंकर अभ्यंकर, श्री. भाऊ मराठे व आपल्या मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या कुलबांधव व भगिनींच्या समोर थाटात संपन्न झाला.

जुन २०१५ मधे बोरिवली येथे विभागीय मेळावा व उद्योजकता पुरस्कार वितरण सोहळा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. नवचैतन्य प्रकाशनच्या सौ. सुप्रिया मराठे व श्री. शरद मराठे यांना श्री. अजित मराठे यांचे हस्ते देण्यात आला. पुरस्कर्तेही तेच आहेत. सन २०१५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा नेहमीची प्रथा मोडून मुंबई ऐवजी पुणे येथे घेण्यात आली. याच सभेमधे आम्हाला युवा प्रतिनिधी मिळाले. याच युवांनी आणखीन युवक जोडले व आपले सांगली येथील अ. भा. कुल संम्मेलन यशस्वी करण्यास अत्यंत मोलाचा हातभार लावला. याशिवाय गोवा परिवार व कर्नाटक परिवार तेथे दरवर्षी मेळावे घेत आहेतच. यावेळी सांगली संम्मेलन खऱ्या अर्थाने अखिल भारतीय झाले कारण महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, गुजरात व मध्यप्रदेश येथुन कुलबांधव उपस्थित होते.

प्रतिष्ठानचे कार्य अधिक जोमाने असेच पुढे जावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. नवीन कार्यकारिणीत तरुणांचा लक्षणीय सहभाग असावा असे वाटते. त्यामुळे प्रतिष्ठानच्या नवीन कार्यकारिणी व विश्वस्तांच्या निवडीसाठी इच्छुकांनी, यापूर्वीच पाठवलेले उमेदवारी अर्ज भरून मोठ्या संख्येने दाखल करून निवडून यावे आणि प्रतिष्ठानच्या कार्यात हिरीरीने भाग घेऊन प्रतिष्ठानच्या वृद्धिसाठी कार्यरत व्हावे ही कळकळीची विनंती.

या कार्यकारिणीच्या कालखंडात झालेल्या विविध कार्यांमुळे नवीन कार्यकारिणीला प्रतिष्ठानचे कार्य पुढे नेण्यास निश्चितच एक दिशा मिळेल अशी खात्री आहे. ❖

# जीवेत् शरदः शतम्!

• **श्री. सदाशिव बळवंत मराठे,** बडोदे (पृष्ठ ३८०) दूरध्वनी : ०२६५-२४२३०५५/२४२८६१८

वरील शीर्षक वाचून वाचकांना वाटेल की कुणाला तरी वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्या करीताचे लेखन असेल पण तसे नाहीये. तर मग पहाच वाचून त्यात काय आहे ते!

नारायण रावांनी सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर निवृत्ति नंतरची प्रवृत्ति म्हणून सरकारी पेन्शनरांचे हित सांभाळण्यासाठी पेन्शनरांच्या संख्ये मध्ये २०-२२ वर्षे सतत कुठल्याना कुठल्या तरी पदाधिकारी म्हणून खूप आस्थेने गाजद पदे स्वीकारली आणि ते कार्यरत राहिले. त्यामुळे नोकरीत असतानाचे सहकारी व पेन्शनर झाल्यानंतर अनेक ज्येष्ठ नागरीकांच्या सहवासात राहिल्याने खूप मोठा त्यांचा मित्र परिवार होता.

ह्या साऱ्या सहवासातील मित्र मंडळींना अर्थातच त्यांनी त्यांच्या एवढी शांति-अमृत महोत्सव प्रसंगी आमंत्रित केले होते. ह्या समारंभात त्यांच्यापेक्षा वयाने मोठे असणारे त्यांचे स्नेहीही जे वयाने ९५ वर्षाचे होते अशा ज्येष्ठ नागरीक मित्राने छोटेसे वक्तव्यही केले. वक्तव्याच्या शेवटी त्यांनी नारायण रावांना ''जीवेत् शरदः शतम्!'' म्हणून आशिर्वाद दिला. आशिर्वाद मिळाला त्याचा नारायण रावांना आनंदच झाला पण त्याबरोबरच आशिर्वाद देणाऱ्या स्नेह्यांचे वयाकडे पाहून व त्या वयात त्याची ठणठणीत प्रकृति पाहून आपण स्वतः इतके निरोगी राहू शकू का हाच विचार त्यांच्या मनातून जाई ना. त्याला कारणही तसेच होते. नारायण रावांची ७ वर्षांपूर्वी ह्दयरोगाच्या आजारामुळे बायपास सर्जरी झाली होती. आज नारायणराव ८५ वर्षांत प्रवेश करीत असताना त्यांनी अनुभवलेल्या गत आयुष्याचा आढावा घेताना त्यांच्या मनातून आपण स्वतः बायपास सर्जरी मुळेच जीवन जगत आहोत व ईश्वर कृपेने देवपूजा, खाणे-पिणे, हातात काठी घेतल्याशिवाय फिरणे, स्वतःची कामे स्वतः करणे वगैरे सर्व काही व्यवस्थित चालू आहे असे विचार आले. पण तरीही 'जीवेत् शरदः शतम्' ह्या तीन शब्दांच्या मागे काय अर्थ आहे त्याचा ते विचार करीत असताना 'शरद' हे ऋतुचे नाव आहे. वर्षात शरद ऋतु शिवाय दुसरे पाच ऋतु आहेत पण फक्त शरद ऋतुचे काय महत्त्व आहे. फक्त शरदः शतम् का म्हटले जाते. अशा विचारात असतानाच त्यांच्या हाती पडलेला एक लेख त्यांना वाचायला मिळाला. त्या लेखात लेखकाचे म्हणणे वाचून त्यांच्या विचारांना पुष्टी मिळाली. त्यातही 'शरदः शतम्' शब्द वाचून त्यांना विचारांची दिशा मिळाली लेखक म्हणतो अथर्व वेदाच्या एका सुक्तात आठ लहान मंत्र आहेत ते असे :

| | | |
|---|---|---|
| १) पश्येम शरदः शतम् | – | मी शंभर शरद ऋतु पाहिन |
| २) जीवेत शरदः शतम् | – | मी शंभर वर्ष जगेन |
| ३) शुद्धेय शरदः शतम् | – | माझी शंभर वर्षे सक्षम राहो |
| ४) राहेम शरदः शतम् | – | शंभर वर्षे माझी उन्नति होत राहो |
| ५) पुषेद शरदः शतम् | – | शंभर वर्ष माझी दृष्टी कायम राहो/ पोषण मिळत राहो |
| ६) भवेश शरदः शतम् | – | दुसऱ्या क्रमांकाचा पुनरुच्चार |
| ७) उयेम शरदः शतम् | – | शंभर वर्ष पर्यंत आम्ही पवित्र जीवन जगो व कुत्सित भावनांपासून मुक्त राहो |
| ८) भूयसी शरदः शतम् | – | शंभर वर्षानंतरही साऱ्या कल्याणकारी गोष्टी माझ्या समोर राहो |

हे मंत्र वाचून झाल्या नंतरही 'शरद ऋतु' बद्दलच्या उल्लेखाचे स्पष्टीकरण होत नाही. ह्या साऱ्या गोष्टीचा आणि मात्र शरद ऋतुचाच उल्लेख का केला जातो. तर लेखक पुढे म्हणतो कदाचित अश्विन आणि कार्तिक ह्या महिन्यातील थंडीच्या त्रासाचा सामना करू शकेल आणि ह्या काळातही सर्दी-खोकल्याचा-आजाराचा त्रास सहन करू शकेल तोच बाकीच्या दहा महिन्यात येणारे उलट-सुलट हवामानही सहन करून निरोगी राहू शकेल.

पण माझ्या मते अश्विन कार्तिक हे हेमंत ऋतुत येणारे दोन उत्सवांचे महिने सर्वांना आनंदित ठेवतात एवढेच नाही तर अश्विन महिन्यात त्याचे बाकी राहिलेले उत्सवाचे दिवस तो कार्तिक महिन्यातही घेवून येतो. कार्तिक महिन्यातला बारा महिन्यांचा सेनापतीही म्हटले आहे. हेमंत ऋतुचे चारही हात मानवाला आशिर्वाद देण्यास उत्सुक असतात. अशा ह्या कार्तिक महिन्यात माणूस सहजरित्या झोपलेला उठून बसतो. बसलेला उभा रहातो. उभा राहिलेला दौडू लागतो. हेही काही अंशी पटले तरीही, निसर्गाची देणगी ही की हेमंत ऋतूच स्वास्थ्य चांगले रहाण्याची हमी देतो यात शंका नाही.

वरील लेखकाचे विचार वाचून नारायणराव आपले उर्वरीत आयुष्याचे आयोजन कसे करावयाचे त्याचा मनातल्या मनात विचार चालू असतानाच त्यांना झोप लागली. कारण नुकताच शरद ऋतु संपून हेमंत ऋतुचे आगमन झाले होते आणि शरद ऋतुचा अर्थबोध झाला होता.

नारायणरावांच्या ह्या विचारांचा अनुभव ज्येष्ठ नागरीक

श्रेष्ठ माणसे (वय ८० पार) अशा व्यक्तीही चघळत असतील अशी खात्री आहे. कारण दोन्ही विचार-मते विचार करण्यास उद्युक्त करणारे आहेत. पहा पटते का? कदाचित शरद ऋतुच्या उल्लेखाची अजूनही दुसरी कारणे असू शकतील.

नोंद : वरील लेखाच्या अनुषंगाने अशाच एका प्रश्नाच्या उत्तराची वाचकांकडून अपेक्षा आहे.

प्रश्न : सर्व देव-देवतांच्या स्तोत्रांची सुरुवात 'श्री गणेशाय नमः' म्हणून होते, पण संस्कृत शनिस्तोत्र ह्याला अपवाद का?

## वाचकांचा पत्रव्यवहार

# माझे आयुष्य

।। श्री ।।

प्रिय सौ. सुमेधा ताई,

मी श्रीमती निर्मला जनार्दन मराठे म्हणजे पूर्वाश्रमीची

कु. कुंदा दत्तात्रय घारपुरे, आम्ही चार बहिणी दोघे भाऊ व आई वडील असे आमचे कुटुंब होते. माझे वडील IRRIGATION मध्ये गुजरात राज्यात बडोद्यास होते.

बडोद्याहून त्यांची बदली डाकोर जवळ ठासरा म्हणून, खेडेगावी झाली. तेथे आम्हांस गुजराथी माध्यमातून शिकावे लागले. माझे, पहिले तीन वर्ग मराठी माध्यमातून व मग चौथी, पाचवी, सहावी ठासरा गावी झाले. नंतर पुनः अहमदाबाद जवळ नडियाद नावाचे गावी वडिलांची बदली झाल्याने सातवी, आठवी, नववी नंतर पुनः बडोद्यास आलो व दहावी, अकरावी गुजराथी माध्यमातून झाले. ह्या दोन्ही गावात विभागाचे कॅम्पस असल्यामुळे बरोबरीची मुले खेळण्यास असल्याने ते दिवस खूपच मजेत गेले. त्या वेळी ११ वी एस.एस.सी. बोर्ड बॉम्बे होते. मॅट्रीक झाल्यावर मी इंग्रजी व हिंदी टायपिंग शिकून नोकरीच्या शोधात होते कारण पुढे शिकवणार नसल्याने मी नोकरीच्या तयारीत होते व आई वडील लग्न ठरवायच्या तयारीत होते. माझ्या प्रयत्नांना यश आले व मला ओएनजीसीमध्ये माझी निवड होवून मला जॉईनिंग ऑर्डर देवून यायला सुरुवात करावी असे सांगितले.

नंतर दोन दिवसांनी इंदौरहुन श्री. मराठे मंडळी मुली पाहाण्यास बडोद्यास आले व मला पसंती कळविली मग काय नोकरी मिळाली म्हणून आनंद व आईवडिलांनी मराठे यांचेकडून पसंती आल्याचा आनंद मला मात्र नोकरी करायची होती पण आईवडिलांपुढे आपल्या करीयरसंबंधी बोलायची हिम्मत नव्हती त्यामुळे नोकरीवर जॉईन न होता विवाहबद्ध झाले. त्यामुळे घटना आनंद व दुःख दोन्ही मिश्रित होती.

मग मी आपल्या मुलांचे संगोपन करत सार्वजनिक कार्य करायचे ठरवले. ज्याला ज्या प्रकारची गरज असेल त्याप्रमाणे यथाशक्ती मदत करायची. माझी आई सुगरण असल्याने मला जे काही जमत होते ते त्यांना करून द्यायची व सणासुदीला त्यांना खाऊ पण घालायची. अशा प्रकारे मी माझ्या संसारात मग्न झाले होते. मुले मोठी होऊन लग्नकार्य झाल्यावर मला पुन्हा नोकरी करावी अशी सुप्त इच्छा जागी झाली व मग मी श्री. मराठे ह्यांच्याच विभागात, माझे वडील इरिगेशन गुजराथमध्ये होते तर माझे मिस्टर इरिगेशन (Irrigation) मध्यप्रदेश मध्ये होते तेथे मी 'Daily Wages' वर नोकरीस लागले. १२ वर्षे ह्याच Caderमध्ये काम केले. नंतर मध्यप्रदेश सरकारने असा आदेश दिला की जे 'Daily Wages' वर कार्यरत आहेत त्यांचे Overage झाले असेल तरी नियमित सेवेमध्ये त्यांना निरंतर नियुक्ती द्यावी. त्याप्रमाणे आणखी १३ वर्षे काम करून वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त झाले. नियमित सेवेमध्ये होणारी घटना माझ्या आयुष्यातली एक सुवर्णसंधी होती कारण योग्य वेळी इच्छा असलेली नोकरीची कल्पना उशिरा का होईना साकार झाल्यावर चमत्कार झाल्याचे वाटत होते. बाकी माझे आयुष्य समांतरच गेले. परंतु विविधतेने असल्याने कधीही काही अति म्हणजे आनंद किंवा दुःख झाले नाही. आयुष्य समांतरच गेले. विविधता म्हणजे आधी मराठी शिक्षण मग गुजराथी व मग हिंदी. अशी मी तीन राज्यांशी जोडली गेली आहे. आजोळ महाराष्ट्रात सांगलीत व माहेर बडोद्यास म्हणजे गुजराथ व सासर इंदौर म्हणजे मध्य प्रदेशात व नोकरी निमित्ताने भोपाळमध्ये वास्तव्य आहे. लिखाणाचा सराव नाही परंतु जमेल तसे लिहिले आहे.

आपली

श्रीमती निर्मला जनार्दन मराठे (पृ.८२),
'वास्तुशुभा' ५०८ बी. सेक्टर, सर्वधाम कॉलनी, कोलार रोड
भोपाळ (मप्र) पिन ४६२०४२ भ्रमणध्वनी ९३०२३६८०९९

# ऋषी परंपरा

• **माधव वासुदेव मराठे**, पुणे (पृष्ठ ३८६) भ्रमणध्वनी : ९०२२४१७०२१

आपल्या वैदिक संस्कृतीचा पाया अनेक ऋषींनी रचला आहे. या त्यांच्या श्रेष्ठ कामगिरीमुळेच आज आपली संस्कृती जगात सर्वोत्तम म्हणून विख्यात पावली आहे. या ऋषिंविषयी काही माहिती या महिन्यात असलेल्या ऋषिपंचमी निमित्त देत आहे.

ऋषी : 'ऋष्' धातूपासून 'ऋषी' हा शब्द झाला आहे. वेदमंत्रांचा द्रष्टा म्हणजे कर्ता असा मूळ रूढार्थ आहे. त्रिकालदर्शी, विद्या - तपः संपन्न व्यक्ती म्हणजे ऋषी, असा अर्थ नंतर सामान्यपणे रूढ झाला आहे. विद्या-तपः संपन्न अशा पुरातन विशिष्ट व्यक्तिंचा निर्देश ऋषी शब्दाने होतो. या ऋषिंच्या ठिकाणी प्रजाविस्तार करण्यामुळे प्रजापतित्व व ज्ञानसंप्रदायाच्या प्रवर्तनामुळे आचार्यत्व अशा दोन भूमिका होत्या.

प्रजापती ऋषी : ब्रह्मदेव स्वतः व त्याने प्रजाविस्तार करण्याकरिता जे ऋषी उत्पन्न केले ते प्रजापती ऋषी होत. त्या २१ ऋषिंची नावे पुढीलप्रमाणे - ब्रह्मा, स्थाणू, मनू, दक्ष, भृगू, धर्म, तपस, दम, मरीची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रतू, वसिष्ठ, परमेष्ठी, व विवस्वान.

संसारस्य पारं दर्शयति इति ऋषी अशी ऋषिंची व्याख्या केलेली आहे. संसारात मशगूल झालेल्या जीवांचा आत्म प्रत्येय जागृत करणे हे ऋषिंनी केले.

वैदिक ऋषी व उपनिषदकालीन ऋषी यात फरक आहे.

वैदिक ऋषी हे देवांची आराधना करणारे, यज्ञ करणारे वत्सल तसेच सामाजिक व राज्यकारभारातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राजांना मदत करणारे सल्लागार होते. ऋषिंना वेदविद्यांचे स्फुरण झाल्यावर त्या ऋषिंनी ती वेदविद्या जोपासली, चार वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. एक-एक वेद कंठस्थ करण्यास किमान बारा वर्षे तरी लागतात असे जाणकारांचे मत आहे. अनेक ऋषिंनी वेदना पूरक म्हणून उपवेद, ब्राह्मणे, उपनिषदे इत्यादींची निर्मिती केली. वेदविद्येमुळे मानवाचे मन अध्यात्मात तल्लीन व्हावे व त्या मानवाला केवळ शारीरिक सुखापलीकडील शाश्वत आनंद प्राप्त व्हावा यासाठी ऋषींचे प्रयत्न होते.

उपनिषदकालीन ऋषी हे सर्वसंग परित्याग करून वनातील आश्रमात राहून देवांची आराधना, तप व तत्वचिंतन यात रममाण होत असत. हे ऋषी आत्मज्ञान व्हावे या उद्देशाने आपले आचरण ठेवीत असत. आत्मा हीच जीवनाची परमगती, परमसंपत्ती, हेच परमध्येय व परमआनंद आहे असे मानून त्या आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आपले जीवन व्यतीत करीत असत. आत्माज्ञानासाठी चित्तशुद्धी व तप हे महत्त्वाचे आहे असे ऋषी मानत असत. इंद्रियांसह मनाचा निग्रह करून त्याला आत्म्यामध्ये स्थिर करणे हा तपाचा मुख्य अर्थ आहे असे ते ऋषी मानत असत.

ऋषिंचा निवास प्रामुख्याने वन, अरण्ये, किंवा पर्वतातील गुंफेत असे. त्या ठिकाणी हे ऋषी तपश्चर्या करत असत. वेद, उपनिषदे वगैरे वेदांसंबंधी अध्यापन करणारे ऋषी वनामध्ये आपले आश्रम उभारत असत. या ऋषिंना आचार्य म्हणत असत. आचार्यांच्या तपश्चर्येसाठी त्या वनात निराळी एकांत जागा असे. ऋषिंचा निवास ज्या वनांमध्ये असे त्या वनांना तपोवने म्हणत. तपोवनात ऋषिंच्या अनेक वस्त्या असत; त्यांना आश्रम असे नाव असे. आश्रमात ऋषिंच्या निवासाकरिता पर्णकुटी तसेच फळे, फुले व छाया देणारे वृक्ष असत. आश्रमामध्ये तपश्चर्येकरिता 'पंचवटी' तयार करीत. बसण्याकरिता मध्ये चार हात लांबी-रुंदीचा कट्टा तयार करून त्यांच्या भोवतालच्या पूर्व, उत्तर, पश्चिम, दक्षिण आणि आग्नेय या दिशांना अनुक्रमे पिंपळ, बेल, वड, आवळी आणि अशोक हे वृक्ष असत. पंचवटीत केलेल्या तपश्चर्येचे फळ अधिक मिळते. या प्रत्येक आश्रमात प्रायः एकेक कुलपती असे. दहा हजार विद्यार्थांची अन्नवस्त्रादिकांच्या योगे पोषणाची जबाबदारी स्वीकारून त्यांना अध्यापन करणाऱ्या ऋषिंना कुलपती म्हणत असत. ऋषिंचे जीवन कंदमुळे, फळे व शेतात न पिकविलेले, वनात आपोआप उत्पन्न झालेले धान्य, यांच्या योगे होत असे. ऋषिंच्या ठिकाणी त्रिकालज्ञता, इंद्रियनिग्रह, सत्य, निग्रहानुग्रहसामर्थ्य, वैराग्य, संतोष, दया इ. गुण होते. ऋषिंना हजारो वर्षे आयुष्य असल्याबद्दलचे उल्लेख आहेत.

आत्मज्ञानाच्या अभ्यासासाठी हे ऋषी आहारशुद्धिला पण खूप महत्त्व देत असत. आहारशुद्धी व निग्रह यामुळे आत्मबळ वाढते व टिकून राहाते असे ऋषी मानत असत. आत्मबलाने विवेकबुद्धी जागृत होऊन देहाच्या दास्यातून मुक्तता होते याची ऋषिंना जाणीव झाली होती. जीवन हा यज्ञ आहे. तप, ज्ञान, सरलता, अहिंसा व सत्यवचन या त्या यज्ञाच्या दक्षिणा आहेत असे छंदोग्यात म्हटले आहे. आत्मज्ञान प्राप्तीसाठी नीतिचा विचार प्रमुखपणे ऋषिंनी मांडला आहे. ऋषी आपल्या शिष्यांना ज्ञानदानासह नीतिचे पाठही देत असत. कर्म, उपासना किंवा ज्ञान यापैकी कुठल्याही अभ्यासाने परमात्म्याचा आत्म-साक्षात्कार होतो अशी ऋषिंची ठाम धारणा होती.

मत्स्य पुराणात ऋषिंचे मूलभूत सात प्रकार सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे :

(१) ब्रह्मर्षी, (२) देवर्षी, (३) महर्षी, (४) परमर्षी, (५) कांडर्षी, (६) श्रुतर्षी आणि (७) राजर्षी.

ब्रह्म जाणणारे किंवा ब्राह्मण ऋषी ते ब्रह्मर्षी. या वर्गात कश्यप, वसिष्ठ, भृगू, अंगिरस, अत्री इ. ऋषी येतात.

देवजातीचे जे ऋषी ते देवर्षी. या गटात धर्म, पुलस्त्य, क्रतू, पुलह, नर-नारायण, वालखिल्या, नारद इ. ऋषी येतात.

महर्षी व परमर्षी यांच्या स्पष्ट विभागणी नाही. 'श्रेष्ठ' ऋषी या अर्थाने अनेक प्रकारच्या ऋषिंना उल्लेख केलेला आढळतो.

कांड म्हणजे धर्मशास्त्र, पूर्वोत्तर मीमांसा, व्याकरण, न्याय, धनुर्विद्या इ. शास्त्रे प्रवृत्त करणारे जैमिनी, व्यास, शांडिल्य इ. जे ऋषी, ते कांडर्षी अथवा वेदकांडांचे प्रवर्तक प्रजापती सोम, अग्नी इ. जे ऋषी ते कांडर्षी.

अन्य ऋषिंपासून विद्याग्रहण करून जे ऋषीपदास पोहोचले ते श्रुतर्षी. आयुर्वेदपर ग्रंथांचे प्रणेते सुश्रुतादी या गटात येतात. क्षत्रिय जातीचे अथवा प्रजानुरंजनामुळे जे ऋषित्वाला प्राप्त झाले ते राजर्षी. ऋतुपर्ण, इक्ष्वाकू, नाभाग इ. राजे या गटात मोडतात.

सप्तर्षी : ऋषिसंस्थेच्या पोटात 'सप्तर्षी' ही संस्था आहे. प्रत्येक मन्वंतरात सप्तर्षी भिन्न-भिन्न असतात व मन्वंतरारंभी प्रजोत्पादन व धर्मस्थापना ही कार्ये मुख्यतः त्यांच्याकडेच असतात. एकूण चौदा मन्वंतरे सांगितली आहेत. मन्वंतर ही कालमापनाची एक पौराणिक संकल्पना आहे. सध्या सातवे म्हणजे वैवस्वत मनूचे मन्वंतर सुरू आहे. अत्री, वसिष्ठ, कश्यप, गौतम, भरद्वाज, विश्वामित्र, जमदग्नी हे सप्तर्षी या मन्वंतराचे मानले जातात.

गोत्रर्षी : मानववंशातील अनेक कुलशाखा ज्या ऋषिंपासून प्रवृत्त झाल्या, त्या कुलशाखाप्रवर्तक ऋषिंना गोत्र ऋषी असे पारिभाषिक नाव आहे. विश्वामित्र, जमदग्नी, भरद्वाज, गौतम, अत्री, वसिष्ठ, कश्यप आणि अगस्त्य हे आठ गोत्रप्रवर्तक ऋषी आहेत. या आठ ऋषिंनी प्रवृत्त केलेल्या कुलांत असंख्य गोत्रसंज्ञक ऋषी उत्पन्न झाले. बौधायनाने प्रवरानुसार ४९ गण कल्पून त्या सर्व गणांत मिळून ८३५ गोत्रर्षिंची गणना केली आहे. इतर सूत्रकारांनी गणांची व गोत्रांची कमी अधिक संख्या सांगितली आहे.

महाभारतातील शेवटच्या पर्वातील राजा जनमेजय याने सर्प यज्ञ केला. त्या वेळी वैशंपायन ऋषी प्रमुख होते. ते वेद विद्येतील ज्ञानी होते. ऋषी परंपरेतील वैशंपायन ऋषी हे शेवटचे ज्ञानी ऋषी म्हणून ओळखले जातात.

आपल्या चित्पावनांत १४ गोत्रर्षी आहेत :

अत्री, कपि, काश्यप, कौण्डिल्य, कौशिक, गार्ग्य, जमदग्न्य, नित्युंदन, बाभ्रव्य, भारद्वाज, वत्स, वासिष्ठ, विष्णुवृद्ध, आणि शांडिल्य. आपण मराठे कपी गोत्री आहोत.

मानवाला ईश्वर प्राप्तीचा मार्ग दाखवणा-या त्या ऋषिंचे स्मरण ऋषीपंचमीला तरी करणे योग्य ठरेल. आणि म्हणूनच ऋषीपंचमीला आपल्या धर्मात महत्व आहे जे आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे व ऋषीपंचमी निरनिराळ्या प्रकारे करून ऋषी स्मरण केले पाहिजे. ❖

# सहवेदना

## ज्योतिषालंकार ज. गो. मराठे

वेंगुर्ले-आडेली येथील मुळचे, विरार येथे स्थायिक असलेले ज्योतिषालंकार जनार्दन गोविंद मराठे (ज.गो.मराठे) यांचे दि. १० जुलै रोजी विरार येथील राहात्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. १९९२ साली मुंबई गोदीतून मधून शेड सुपिरिडेंट पदावरून निवृत्त झाले होते. आपल्या ८३ वर्षांच्या समृद्ध आयुष्यात त्यांनी भावी पिढीचे आचार-विचार आणि उच्चार उत्तम होण्यासाठी 'सुगिता मंडळ' संस्कार केंद्राची स्थापना आणि पद्मत नगर, विरार येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'ज्येष्ठ नागरीक' संघाची स्थापना आदी बरेच उपक्रम करून सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. किर्तन, प्रवचन, भगवद्गीतेवर आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, चित्रकला, ज्योतिष, हस्तरेषा इत्यादी क्षेत्रात पारंगत होते. त्यांनी 'शंकर दिग्विजय' या आद्य शंकराचार्यांच्या चरित्रग्रंथाचा मराठी अनुवाद केला आहे. याबद्दल 'नवाकाळ'ने विशेष अग्रलेख लिहून त्यांच्या या कार्याचा गौरव केला होता. 'व्यवसायाच्या दशदिशा' हे ज्योतिषशास्त्र आणि व्यवसायाचा संबंध दर्शविणारे पुस्तक, 'कृपाछत्र' हा कवितासंग्रह आणि 'जेथे जातो तेथे' हे आत्मचरित्र लिहून साहित्य व आध्यात्मिक क्षेत्रातही महत्त्वाचे योगदान दिले.

'हितगुज'मध्येही त्यांनी लेखन केले होते. ज.गो. मराठे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, दोन मुली, सहा नातवंडे, पणतू असा परिवार आहे.

# प्रकाशझोत-श्री. रविंद्र प्रभाकर मराठे

बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (एमडी आणि सीईओ) म्हणून रविंद्र प्रभाकर मराठे यांची नियुक्ती जाहीर झाल्यानंतर सर्वप्रथम प्रतिक्रिया उमटली, ती पुण्यात मुख्यालय असलेल्या या बँकेला दोन दशकानंतर मराठी मुख्याधिकारी लाभल्याची. वास्तविक, बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर आणि आजच्या जागतिकीकरणाच्या काळात मराठी आणि अन्य भाषिक असा भेद करणे संकुचितपणाचे आहे; परंतु त्यात संकुचितपणापेक्षा आपलेपणाची भावना अधिक आहे. यशस्वी बँकर, अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक आणि नियोजनतज्ज्ञ म्हणून ओळख असलेल्या श्री. रविंद्र मराठे यांच्याबाबतची ही प्रतिक्रिया आत्मीयतेपोटी उमटलेली आहे.

सध्या बँक ऑफ इंडियात कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असलेले श्री. रविंद्र मराठे मूळचे गुजरातमधील बडोद्याचे. तेथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठातून १९८० मध्ये अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी त्यांनी सुवर्णपदकासहित मिळवलेली आहे. १९८२ साली नियोजन अधिकारी म्हणून बँक ऑफ बडोदात रुजू होऊन त्यांनी बँकिंग क्षेत्रात प्रवेश केला. बँकिंग क्षेत्रात कम्प्युटरचे महत्त्व ओळखून त्यांनी कम्प्युटर ॲप्लिकेशनमधील सर्टिफिकेट अभ्यासक्रम पूर्ण केला; तसेच सर्टिफाईड असोसिएट ऑफ द इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स (सीएआयआयबी), डिप्लोमा इन ट्रेझरी, इनव्हेस्टमेंट अँड रिस्क मॅनेजमेंट (आयआयबीएफ) आदी अभ्यासक्रमही प्राविण्यासह पूर्ण केले. बडोदा बँकेच्या कॉर्पोरेट प्लॅनिंग विभागात त्यांनी दीर्घकाळ काम केले आहे. धोरणात्मक नियोजन, अर्थसंकल्प, वित्तीय क्षेत्राचे संशोधन, व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली माहिति तंत्रज्ञान प्रणाली, एन्व्हॉरॉन्मेंटल स्कॅनिंग अँड डेटा वेअरहाऊस अशा विविध क्षेत्रांत मराठे यांनी आपला ठसा उमटवला आहे. कॉर्पोरेट क्रेडिट आणि ट्रेड फायनान्ससाठीच्या मोठी कर्जे देणाऱ्या शाखांमध्येही त्यांनी सहा वर्षांहून अधिक काळ काम केले आहे.

बँक ऑफ बडोदामध्ये सरव्यवस्थापक पदावर काम करत असतानाच २०१५ मध्ये त्यांना बँक ऑफ इंडियामध्ये कार्यकारी संचालक पदावर काम करण्याची संधी चालून आली. बँकिंग क्षेत्रातील विविध जबाबदाऱ्या समर्थपणे निभावलेल्या मराठे बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये आपल्या कर्तबगारीची मुद्रा उमटवतील यात शंका नाही. मात्र, 'चालक से मालक' हे भ्रष्टाचाराचे प्रकरण निकाली लावण्याबरोबरच अनुत्पादित कर्जाचे वाढते प्रमाण आणि अन्य अडचणींमधून मार्ग काढण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. दीर्घकालीन अनुभव, चपखल नियोजन आणि नवा दृष्टिकोन यामुळे बँक ऑफ महाराष्ट्रला मराठे नवी उभारी देतील, अशी आशा आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. रवींद्र प्रभाकर मराठे यांचे हार्दिक अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा. ❖

---

# मान्यताप्राप्त ज्येष्ठ समाजसेवक श्री सुरेशराव मराठे (पृ.३६५) यांचा अमृत महोत्सवी सोहळा

आपल्या मराठे प्रतिष्ठानचे सदस्य सुरेश मराठे मुळगाव 'कळंबुशी' ता. संगमेश्वरचे ग्रामस्थ. सध्याचे दहिसर वैशाली नगरचे रहिवासी यांचा नुकताच ७५ वर्षीय अमृत महोत्सवी सोहळा सुसंपन्न झाला. या सोहळ्याला त्यांचे समस्त कुटुंबीय नातेवाईक उपस्थित होते. तदवत त्यांचे सहकारी, अधिकारी (निवृत्त) आणि सामाजिक सार्वजनिक क्षेत्रांतील मान्यवर मंडळी उपस्थित होती. उपस्थितांनी श्री. सुरेश मराठे यांना अखंड निर्दोष निरोगी सुदृढ दिर्घायुष लाभो अशा शुभेच्छा दिल्या.

मराठे प्रतिष्ठानचे सक्रीय सदस्य श्री. मोहन सदाशिव मराठे आणि कुमुदताई मराठे डोके चित्रकार यांचे सुरेश मराठे बंधू आहेत. तसेच सौ. संगिता प्राची दत्तप्रसाद मराठे दिवेकर (मुलगी), चि. वसंत सुरेश मराठे (मुलगा), चि. सचिन सुरेश मराठे (मुलगा) असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठान द्वारा श्री. सुरेश मराठे यांचे अभिष्टचिंतन. त्यांना आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभो ही शुभेच्छा.

– **श्री. सुरेशराव मराठे,** दहिसर
दूरध्वनी २८९६४२७६

# दत्त संप्रदायाचा स्वातंत्र्य लढ्याला हातभार

**• डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे,** (पृष्ठ १२०) दूरध्वनी - ०२२-२४१५०८८९

१८५७च्या स्वातंत्र्य समराचे नेते नानासाहेब पेशवे यांनी दत्तपंथाचा हिंदू व मुस्लिम क्रांतिकारकांना एकत्र ठेवण्यासाठी अप्रतिम उपयोग केला आहे.

१८५४ साली नानासाहेबांनी सर्व हिंदुस्थानचा दौरा केला. काशी, गया, जगन्नाथपुरी, रामेश्वर, शुचिंद्रम्, गाणगापूर, कुरवपूर, औदुंबर, त्र्यंबकेश्वर, गिरनार येथे त्यांनी भेट दिली. निरनिराळ्या संतमहंतांचे आशीर्वाद घेतले व कंपनी सरकारला संपविण्याचा वज्रनिर्धार केला. रंगो बापूजी, चिमासाहेब भोसले यांच्यासारख्या मातब्बर व्यक्तिंशी, माणिक प्रभूसारख्या संताशी सल्लामसलती केल्या. १८५७ ते १८६२ पर्यंत लढा दिल्यावर, तात्या टोपे व रावसाहेब पेशवे फाशी गेल्यावर, निर्धाराने त्यांनी स्वातंत्र्यलढ्याची पुनर्रचना, १९०६ सालच्या नोव्हेंबरमध्ये स्वामी ब्रह्मचैतन्यांच्या हस्ते अग्निसंस्कार घेईपर्यंत केली. अकोटचे ब्रह्मचारी महाराज, सोनगीर बाबा, गजानन महाराज, गिरनारचे व सौराष्ट्रमधील अनेक तपस्वी, शिर्डीचे साईबाबा, परब्रह्माची उपासना स्वराज्य येण्यासाठी करीत राहिले. दत्त दैवत हिंदू व मुसलमान या दोघांचेही दैवत असल्यामुळे अनेक क्रांतिकारक वैरागी वेषाने दत्तपंथीय मठांचा आश्रय करून राहिले. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांना अशाच एका महापुरुषाने महालक्ष्मी मंदिराच्या पाठीमागील खडकावर वासुदेवजी ध्यानमग्न असताना एक तलवार प्रसाद म्हणून दिली व त्यांनी निर्धाराने पुन्हा एकदा इंग्रजांविरुद्ध लढा केला. दत्तपंथाने धर्म जागृतीचे कार्य अविरत केले आहे. ❖

# चित्रकला माझी चित्रकला

**• कुमुद सु. डोके,** (पृष्ठ ३६६) दूरध्वनी - ०२०-२५८८१६५५

डोळ्याला दिसते, मनात ठसते,
हृदयाला भावते, तीच ही चित्रकला
अगणित रंगरसाची दुनियादारी
हिच्या सादरीकरणाची तऱ्हाच न्यारी
  आकार रेषांच्या भाषेत बोलते,
  उत्स्फूर्त अमूर्त अवकाशाला भिडते
  असंख्य पोतांनी सजून येते
  मलमली रंगांचे लेपन लेते
मनातील स्पंदनांची चित्राची भाषा
उद्याच्या जाणिवेची जनांची आशा
निसर्ग देणगीची नेमकी दिशा
कल्पना स्फुरण्या मार्ग दावी खासा
  चित्राच्या भाषेला नाही लिपीचे बंधन
  हृदयातील भावनांचे गवसे स्पंदन
  हळुवार उसळती कारंजी रंगांची
  साधक प्रेक्षकांच्या मनोमिलनाची
कलावंताचा मर्मबंधी हुंकार
नवयुवतीचा जणू पदन्यास झंकार
अवतरे रूपगर्वी कलावती
म्हणजेच रूपसंपन्न कलाकृती रूपसंपन्न चित्रकृती
अशी असते कलेत कला चित्रकला
चित्रकला एके फक्त चित्रकला

## जंगली मांजरीसारखा दिसणारा मांसभक्षक प्राणी - फोस्सा



आफ्रिकेच्या दक्षिण पूर्व भागातील मादागास्कर या ठिकाणचे प्राणी खूप वेगवेगळे असतात. त्यामध्ये फोस्सा नावाचा जंगली मांजरीप्रमाणे दिसणारा प्राणी आढळतो. या प्राण्याचे शेपूट खूप लांब असते. तसेच हा प्राणी झाडाच्या फांदीवर राहून जाड शेपटीने स्वतःचे संतुलन कायम ठेवतो. उदमांजर नावाच्या प्राण्याप्रमाणे हा प्राणी त्याच्या शरीरातून एक विशेष गंध सोडतो. मादी फोस्सा २ ते ४ पिल्लांना जन्म देते. तसेच मादी फोस्सा १५ वर्षे जिवंत राहाते.

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०१६



आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस न तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@maratrhepratishthan.org या इमेल आयडी वर केवळ '.jpg' format मधील कमाल २ फाईलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. ६ सप्टेंबर २०१६ ते दि. १८ सप्टेंबर २०१६.
- छायाचित्राच्या caption मध्ये प्रेषकाचे नाव किंवा शहर यांचा उल्लेख नसावा. प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डींग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके:

- प्रथम पारितोषिक : रु.१००१/-
- द्वितीय पारितोषिक : रु. ७५१/-
- तृतीय पारितोषिक : रु. ५०१/-

२० पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास २ उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.

**टीप:**

१. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.

३. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा. ई-मेल : hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७



## सहवेदना

मराठे प्रतिष्ठानचे युवा प्रतिनिधी श्रीपाद मराठे - कल्याण यांची आत्या व श्री बाळकृष्ण नारायण मराठे, श्री मेघःशाम नारायण मराठे, वेंगुर्ला यांच्या भगिनी कै. सौ. सुनंदा गंगाधर गोवंडे यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वार्धक्याने त्यांचे घरी - मसुरे ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथे बुधवार दिनांक २० एप्रिल २०१६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात पती, चार मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अहेवपणी त्यांना मृत्यू आला ही भाग्याची गोष्ट आहे.

**मराठे प्रतिष्ठानतर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली.**
**ईश्वर त्यांना सद्‌गती देवो.**



**इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे**
**प्रथम क्रमांक चि. कु. अनघा निरंजन भक्ती मराठे (पृ. १२०)**
**मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन**

# श्री. प्रभाकर दामोदर मराठे यांना जीवनगौरव पुरस्कार




मराठे प्रतिष्ठानचे भूतपूर्व कोषाध्यक्ष, चार्टर्ड अकाऊंट श्री. प्रभाकर मराठे (पृ.१२०) यांना 'योगविद्या निकेतन' या संस्थेने 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले. दि. ३१ जुलै २०१६ ला 'योगभवन' वाशी येथे समारंभ संपन्न झाला. पद्मश्री योगाचार्य श्री. सदाशिवराव निंबाळकर यांच्या हस्ते मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्मृतीचिन्ह देवून श्री. प्रभाकर मराठे यांना गौरविण्यात आले. सचोटीने, पारदर्शकपणे संस्थेचा आर्थिक व्यवहार पाहातात. गेली ३८ वर्षे ते 'योगविद्या निकेतन' संस्थेचे कोषाध्यक्ष आहेत. 'योगिनी' संस्थेचा तिसरा टिचर ट्रेनिंग कोर्स त्यांनी १९८० मध्ये पूर्ण केला आहे. शीर्षासन, नवली आणि इतर योगासने ते सफाईने करतात.

श्री. निंबाळकर सरांनी श्री. प्रभाकर मराठे यांची सुविद्य पत्नी डॉ. सौ. सुमेध मराठे यांचाही साडी, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

या वेळी सी.ए. श्री. प्रभाकर मराठे यांनी 'योगविद्या निकेतन'ला दहा सहस्र रुपयांची देणगी दिली.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. प्रभाकर मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.

---

**BOOK POST**

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**